सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ५२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १५ मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## देशाची गोपनीय माहिती दिली पाकिस्तानी एजंटला; शस्त्रनिर्मिती कारखान्यातील कर्मचाऱ्याला अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५लखनऊ**

देशाविषयी गोपनीय आणि संवेदनशील माहिती पाकिस्तानी एजंट असलेल्या फेसबुक फ्रेंडला (नेहा शर्मा) पुरवल्याप्रकरणी उत्तर प्रदेशातील दहशतवादीविरोधी पथकाने (एटीएस) हजरतपूरच्या शस्त्रनिर्मिती कारखान्यातील कर्मचाऱ्याला अटक केली आहे. एटीएसने अधिकृतरीत्या ही माहिती प्रसिद्धीमाध्यमांना शुक्रवारी दिली.

या प्रकरणातील आरोपीचे नाव रवींद्र कुमार असे आहे. आरोपी शस्त्रनिर्मिती कारखान्यातील एका विभागाचा प्रमुख आहे. त्याच्याकडून पाच गोपनीय कागदपत्रे, ६,२२० रुपये, एक मोबाइल फोन, एक एटीएम कार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड आणि पॅन कार्ड जप्त करण्यात आले आहेत, असे एटीएसच्या निवेदनात म्हटले आहे.

गेल्या काही दिवसांपासून आरोपी रवींद्र कुमार अतिशय संवेदनशील आणि गोपनीय माहिती पाकिस्तानी एजंट असलेल्या आपल्या फेसबुक फ्रेंडला पुरवत होता. ही एजंट पाकिस्तानी गुप्तहेर संस्थेसाठी काम करीत असल्याची आणि पैशांचे प्रलोभन दाखवून भारताविषयीची संवेदनशील कागदपत्रे आणि गोपनीय माहिती काढण्याचा प्रयत्न करीत असल्याची 'खबर' एटीएसला काही दिवसांपासून मिळत होती.

### मोबाइलमध्ये आढळली गुप्त कागदपत्रे

संपूर्ण पाळत ठेवल्यानंतर रवींद्र कुमार याला अटक करण्यात आली.



एटीएसच्या आग्रा युनिटने आरोपी रवींद्र कुमारला ताब्यात घेऊन प्राथमिक चौकशी केली. तेथून त्याला गुरुवारी एटीएसच्या लखनौ मुख्यालयात आणण्यात आले. त्याच्या मोबाइलमध्ये देशाच्या सुरक्षिततेविषयीची संवेदनशील आणि गुप्त कागदपत्रे आढळली. ती त्याने पाकिस्तानी एजंटला पाठवल्याचेही स्पष्ट झाले. मात्र या प्रकाराबद्दल त्याला कोणतेही स्पष्टीकरण देता आले नाही, अशी माहिती एटीएसने दिली.

सखोल चौकशीत आरोपी रवींद्र कुमारने गुन्ह्याची कबुली दिल्याचा दावा एटीएसने केला. त्याने दिलेल्या गुन्ह्याच्या कबुलीमुळे त्याच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम १४८ आणि कार्यालयीन गुप्तता कायदा १९२३नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आणि त्याला रीतसर अटक करण्यात आली.

आरोपी रवींद्र कुमार २००६ पासून ऑर्डिनन्स फॅक्टरीत काम करतो. सन २००९ पासून तो विभागप्रमुख पदावर आहे. जुलै २०२४मध्ये त्याची फेसबुकवर नेहा शर्मा हिच्याशी मैत्री झाली. तो तिच्याशी वारंवार व्हॉटस्पवर ऑडीओ आणि व्हिडीओ कॉलद्वारे संभाषण करीत होता, असे एटीएसने सांगितले.

श्रीमंत होण्याच्या मोहापायी आरोपी रवींद्र कुमार नेहा शर्माला गोपनीय माहिती पाठवत असे. त्यानंतर तो दोघांमधील व्हॉटस्प ऑडीओ आणि व्हिडीओ संभाषण वारंवार नष्ट करीत असे; परंतु काही चॅट्स आणि गोपनीय कागदपत्रे डिलिट करण्यास तो विसरल्याने ती त्याच्या मोबाइलमध्ये राहिली, असे एटीएसने म्हटले आहे.


देशाच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण होण्याच्या शक्यतेने एटीएस पथकाने या प्रकरणाचा तपास सुरू केला होता. अखेर एटीएसने या प्रकरणाचा छडा लावला. हजरतपूर शस्त्रनिर्मिती कारखान्यातील कर्मचारी असलेला रवींद्र कुमार हा अतिशय संवेदनशील आणि गुप्त माहिती पाकिस्तानी एजंटला पाठवत असल्याचे एटीएसने केलेल्या चौकशीतून निष्पन्न झाले.

## मी कधीही चुकीचे काम करत नाही, माणिकराव कोकाटेंचं वक्तव्य

### न्यायालयाच्या निरीक्षणावर स्पष्टच बोलले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नाशिक**

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना नाशिक न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली होती. त्यामुळे त्यांची आमदारकी रद्द होण्याच्या संदर्भातील चर्चा राजकीय वर्तुळात सुरु होती. न्यायालयाने त्यांच्या शिक्षेला स्थगिती दिल्यामुळे त्यांच्यावरील अपात्रतेची होणारी कारवाई टळली आहे. मात्र, नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने निकाल देताना जे निरीक्षण नोंदवले आहे ते निरीक्षण आता चर्चेत आले आहे. माणिकराव कोकाटे यांना शिक्षा दिली तर त्यांच्या विधानसभा मतदारसंघाची निवडणूक पुन्हा घेण्याची वेळ येईल आणि जनतेचा पैसा खर्च होईल, असे निरीक्षण नाशिक सत्र न्यायालयाने नोंदवले आहे. नाशिक सत्र न्यायालयाच्या



निरीक्षणावर विरोधकांनी संताप व्यक्त केलाय. तर माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांच्या कन्या अंजली दिघोळे यांनी नाशिक सत्र न्यायालयाच्या निरीक्षणाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. आता यावर माणिकराव कोकाटे यांनी भाष्य केलंय.

**कर नाही त्याला डर कशाला**

माणिकराव कोकाटे म्हणाले की, माझ्या बाबतीत न्यायालयाने अद्याप निकाल दिला नाही, अपील सुरू राहणार आहे. त्यामुळे न्यायालय निर्णय घेईल, जो निकाल असेल तो मला मान्य आहे.

## शरद पवारांचं पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र कौतुक, आभार आणि पत्रातून केली एक मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नवी दिल्ली**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा आणि अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवले आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी पंतप्रधान मोदी यांनी उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे पत्रातून आभार मानले आहे. तुमचे सखोल आणि अंतर्दृष्टीपूर्ण भाषण जगभरातील मराठी लोकांना खूप भावले, असा उल्लेख देखील या पत्रात शरद पवारांनी केला आहे. तब्बल सात दशकांनंतर मराठी साहित्य संमेलन दिल्लीत पार पडलंय. तर शरद पवार या संमेलनाचे स्वागताध्यक्ष असल्याने त्यांनी पंतप्रधानांच्या विशेष उपस्थिती बाबत त्यांचे पत्रातून आभार मानले आहे.

दरम्यान, दिल्लीत पार पडलेल्या या संमेलनाचे ठिकाण असलेल्या तालकटोरा स्टेडियममधे बाजीराव पेशवे, महादजी शिंदे आणि मल्हारराव होळकर यांचे अर्धाकृती पुतळे बसवण्याचा प्रस्ताव सरहद संस्थेने मांडला आहे. पण अनेक साहित्यिकांची मागणी आहे की पूर्ण आकाराचे घोडेस्वारी पुतळे उभारले जावेत. तालकटोरा स्टेडियम हे नवी दिल्ली महानगरपालिकाच्या अखत्यारीत येत असल्याने अश्वारूढ पुतळे बसविण्यासाठी आवश्यक त्या परवानग्या देण्यासाठी दिल्ली सरकार आणि छऊन्चउ ला निर्देश देण्याबाबत आपण सांगावे, अशी मागणी ही शरद पवार यांनी पत्रातून पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे केली आहे. तर काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहून अर्धाकृती पुतळा बसवला जावा, अशी अमित शाह यांना विनंती केली होती. मात्र आता साहित्यिकांची मागणी लक्षात घेता शरद पवारांनी ही यात हस्तक्षेप करत आपली मागणी केली आहे.

## छत्रपती संभाजी महाराजांच्या सन्मानार्थ... औरंगजेबाच्या कबरी हटवा, विहिंप-बजरंग दलाची शिवजयंतीला राज्यभर मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अहिल्यानगर**

औरंगजेबाच्या राज्यभरातील कबरी तातडीने हटवण्याची मागणी बजरंग दलाने केली आहे. यासंदर्भात तिथीनुसार येणाऱ्या शिवजयंतीच्या दिवशी सोमवारी (१७ मार्च) राज्यभर मोहीम सुरू करण्यात येणार आहे. छत्रपती संभाजी महाराज के सन्मान में बजरंग दल मैदान मे... क्रूरकर्मा धर्मद्वेषी औरंग्याची कबर हटाव मोहीम विहिंप व बजरंग दलाने हाती घेतली असून, यासाठी आंदोलने केली जाणार आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे औरंगजेबाची कबर आहे. त्याचा मृत्यू नगरच्या भिंगारजवळील आलमगीर येथे झाला आहे. आलमगीर येथेही त्याचे स्मृतीस्थळ आहे. त्यामुळे खुलताबाद येथील




कबर काढण्यासह आलमगीर येथील स्मृतीस्थळही काढण्याची विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाची मागणी आहे. याशिवाय राज्यभरात जेथे औरंगजेबाची स्मृतीस्थळे असतील, तेथून ती काढण्याचीही मागणी आहे. यासाठी आंदोलनाचा पवित्रा घेण्यात आला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लवकरात लवकर औरंगयाची कबर खणून काढावी व त्याचे कुठलेही अस्तित्व राहू देवू नये. अन्यथा बजरंग दल चलो संभाजीनगर... व छत्रपती संभाजी महाराज के सन्मान में बजरंग दल मैदान मे... हा नारा देत कारसेवा करेल, असा इशारा देणारे निवेदन सोमवारी १७ मार्च रोजी राज्यातील सर्व तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय येथे तिथीनुसारच्या छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विश्व हिंदू परिषद व बजरंग दल महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन करण्यात येईल, असा इशारा विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे महाराष्ट्र-गोवा बजरंग दल क्षेत्राचे संयोजक विवेक कुलकर्णी यांनी दिला आहे. यावेळी जिल्हा सहमंत्री शरदराव नगरकर उपस्थित होते.

## घर बांधणाऱ्यांना खूशखबर, मिळणार पाच ब्रास मोफत वाळू राज्य सरकारचा निर्णय, चंद्रशेखर बावनकुळेंची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंबई**

राज्यात घरकुल बांधणाऱ्या लाखो लोकांना राज्य सरकारने खूशखबर दिली आहे. आता राज्यात घरकुल बांधणाऱ्यांना मोफत वाळू मिळणार आहे. घरकुल बांधणाऱ्यांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून, या निर्णयाची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाचा फायदा घरकुल बांधत असलेल्या लाखो लोकांना होण्याची शक्यता आहे.

याबाबत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, ज्या ठिकाणी लिलाव झालेले नाहीत. ज्या



ठिकाणी आम्हाला एन्व्हायरमेंट क्लियरन्स मिळाला आहे. त्या ठिकाणी वाळू घाटांचं लिलाव होईल. तसेच घरकुलांना पाच ब्रास मोफत रेती देण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे. माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेतला आहे. त्यासाठीही आम्ही तरतूद करणार आहोत, अशी माहिती त्यांनी दिली.एकंदरीत जेवढी मागणी असेल, तेवढा पुरवठा असं वाळू धोरण आपण तयार करत आहोत. त्यासाठी एम सँड धोरण येत आहे. त्यामध्ये दगड खाणींमधून येणाऱ्या वाळूसाठी आम्ही प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्टो क्रशरसाठी प्रोत्साहन देत आहोत. त्यामाध्यमातून दगडापासून मोठ्या प्रमाणात वाळू तयार होणार असून, त्यामुळे नदीतील वाळूची मागणी कमी होईल. तसेच येत्या दोन वर्षांत वाळूची मागणी आणि पुरवठा यामध्ये जी काही तफावत आहे ती दूर होईल.

## धनंजय मुंडेंचं मंत्रिपद गेलं, आता सहा महिन्यात आमदारकीही जाणार; करुणा शर्मा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५बीड**

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी शपथपत्रात करुणा शर्मा यांच्या मिळकतीबाबत उल्लेख केला नव्हता. त्यामुळे करुणा शर्मा यांनी ऑनलाइन तक्रार केली होती. करुणा शर्मा यांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधात केलेल्या तक्रारीवर आज परळी न्यायालयात सुनावणी होणार आहे. या सुनावणी आधीच करुणा शर्मा यांनी मोठा दावा केलाय. सहा महिन्यात धनंजय मुंडेंची आमदारकी जाईल, असे त्यांनी म्हटले आहे.



करुणा शर्मा म्हणाल्या की, सगळ्यांनी निवडणुकीवेळी बघितले आहे की, मुंडेंनी २०० बूथ कॅप्चर केले आहे. तसे निवडणुकीत माझे नाव टाकले नाही, आमच्या केसचा संदर्भ दिला नाही. २०१४ पासून माझे नाव आणि माझ्या मुलाबाळांचे नाव टाकले नाही. यावर निवडणूक अधिकारी, कलेक्टर कोणीच ऑब्जेक्शन घेतले नाही. २०२४ मध्ये माझ्या मुलांचे नाव टाकले आणि माझे नाव गायब केले. या सर्वावर माझी लढाई सुरू आहे. आता त्यांचे वॉरंट निघेल, त्यांना सहा महिन्यांची शिक्षा होईल. आज स्वतः धनजय मुंडे यांना जावे लागणार आहे. जसे मी बोलले होते की, मंत्रीपद जाणार तर ते गेले. आता मी सांगते की, आमदारकीही जाणार आहे. सहा महिन्यात त्यांची आमदारकी जाईल, असा दावा त्यांनी केला आहे.

## इंडिया आघाडीत रहायचे की बाहेर पडायचे? आम आदमी पक्ष संभ्रमात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५पुणे**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत जागांवरून वाद झाल्याने आम आदमी पार्टीने (आप) काँग्रेसबरोबर फारकत घेतली. आता पंजाब विधानसभा निवडणुकीतही त्यांना काँग्रेसबरोबरच सामना करावा लागणार आहे. काँग्रेस इंडिया आघाडीचे नेतृत्व करत आहे. त्यामुळेच आता 'आप' समोर इंडिया आघाडीत रहायचे की जायचे असा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यातील पदाधिकाऱ्यांचे यासंदर्भातील मत दिल्लीतील पक्षाच्या काही वरिष्ठ पदाधिकाऱ्यांकडून अजमावून घेतले जात आहे.

देशातील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचा देशस्तरावर विरोध करण्यासाठी म्हणून इंडिया आघाडी स्थापन झाली आहे. या आघाडीचे नेतृत्व काँग्रेस करत आहे. 'आप' नेही इंडिया आघाडीत प्रवेश केला आहे. मात्र त्यांनी काँग्रेसपासून दुरावा ठेवला आहे. दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत त्यांनी काँग्रेसला लांबच ठेवले. त्यामुळे त्यांच्या सत्तेला फटका बसला. काँग्रेस उमेदवारांमुळे आपचे काही उमेदवार पराभूत झाले. पंजाब विधानसभेच्या निवडणूका लवकरच होणार आहेत. तिथे 'आप' सत्ताधारी आहे, तर काँग्रेस प्रमुख विरोधी पक्ष आहे. त्यामुळे तिथेही 'आप'ला काँग्रेसबरोबरच लढावे लागणार आहे.

असे असेल तर इंडिया आघाडीत रहायचे कसे? असा प्रश्न आप चे वेगवेगळ्या राज्यांमधील पदाधिकारी विचारत आहेत. आप च्या केंद्रीय नेतृत्वामध्येही याची चर्चा आहे. इंडिया आघाडीत राहून काँग्रेसचे नेतृत्व मान्य करायचे की इंडिया आघाडीतून बाहेर पडून स्वतंत्र अस्तित्व ठेवायचे असा हा प्रश्न आहे. याबाबत पक्षाकडून वेगवेगळ्या राज्यातील पदाधिकाऱ्यांना विचारणा होत आहे. त्यासाठी केंद्रातील काही पदाधिकारी राज्यांचा दौरा करत आहेत. इंडिया आघाडीबरोबर व स्वतंत्र अस्तित्व यात राजकीय फायद्यातोटयाची माहिती त्यांच्याकडून घेण्यात येत आहे. आप चे राज्य प्रवक्ते मुकुंद किर्दत यांनी सांगितले की बैठका होत असल्या तरी त्या वेगळ्या कारणांसाठी होत आहेत.

दोन्ही निवडणुकांमध्ये पक्षाने एकही जागा न मागता आघाडीच्या उमेदवारांचा प्रचार केला. त्यातून विधानसभा लढवू इच्छिणारे काही कार्यकर्ते नाराज झाले. त्यांची समजूत काढण्यासाठीची दिल्लीतील काही पदाधिकारी महाराष्ट्रात येत आहेत अशी माहिती किर्दत यांनी दिली.

## पॅन कार्ड सारखेच मतदान कार्डही आधारसोबत लिंक करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंबई**

काही महिन्यापूर्वीच पॅन कार्ड आधारकार्ड सोबत लिंक करण्यात आले होते. आता या पद्धतीनेच मतदान कार्ड आधार कार्डसोबत लिंक करण्याची तयारी निवडणूक आयोग तयारी करत आहे. निवडणुकीतील पारदर्शकता वाढवण्याच्या उद्देशाने, मतदार ओळखपत्र आधारशी जोडण्याची प्रक्रिया आता जलद करण्यात येणार आहे.

या संदर्भात आता निवडणूक आयोगाची एक महत्त्वाची बैठक पुढील आठवड्यात होणार आहे, यामध्ये गृह मंत्रालय, कायदा मंत्रालय आणि णखऊ-ख चे उच्च अधिकारी सहभागी होतील. या उपक्रमाचा उद्देश बनावट आणि नकली मतदार ओळखून मतदार यादी काढण्याचा आहे.इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, २०२१ मध्ये लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ मध्ये सुधारणा केल्यानंतर, निवडणूक आयोगाने मतदारांकडून स्वेच्छेने आधार क्रमांक गोळा करण्यास सुरुवात केली. निवडणूक आयोगाने अद्याप आधार आणि मतदार ओळखपत्र डेटाबेस लिंक केलेले नाहीत.

## संपादकीय ......

# हवामान बदलाची शेतीपुढील आव्हाने

हवामान बदलाचा परिणाम शेतीवर स्पष्टपणे दिसू लागला आहे. फेब्रुवारी २०२४ हा सर्वात उष्ण महिना होता, असे म्हटले जात होते; पण जानेवारी २०२५ मध्ये ज्या पद्धतीने तापमान वाढले आहे आणि फेब्रुवारी मध्येच देशाच्या बहुतेक भागात तापमानात सतत वाढ होत आहे, तो चिंतेचा विषय बनत आहे. देशाच्या अनेक भागांत दिवसाचे तापमान २९ अंशांच्या पुढे जात आहे. त्याचा फटका शेतीला बसत आहे.

वाढत्या तापमानामुळे परिसंस्थेवर वाईट परिणाम होत आहे. वाढणारे तापमान केवळ आजार पसरवत नाही, तर संपूर्ण व्यवस्थेवर नकारात्मक परिणाम करत असतो. चिंताजनक बाब म्हणजे, भूजल पातळीत सतत घट होत असल्याने मोठी लोकसंख्या प्रभावित होण्याची शक्यता आहे. तापमानवाढीने हिमनद्या वेगाने वितळत असल्याचा परिणाम दिसून येत आहे. त्याचा थेट परिणाम अवकाळी अतिवृष्टी, दुष्काळ, वादळ, जंगलातील आगी इत्यादी स्वरूपात दिसून येत आहे. शेतीच्या बाबतीत हवामानातील अनपेक्षित बदलाचा पीक चक्रावर नकारात्मक परिणाम होत आहे. पेरणीपासून ते पीक पिकेपर्यंत आणि तयार होईपर्यंत एक चक्र असते. प्रत्यक्षात जे घडत आहे ते पाहिल्यास ज्यावेळी पीक फुलोरा घेते त्यावेळी तापमान वाढल्याने त्यांची वाढ थांबते आणि पीक पिकू लागते. यामुळे नैसर्गिकरीत्या पीक खराब होते आणि उत्पादनात घट होते. डिसेंबर, जानेवारी या हिवाळ्यातील महिने आणि फेब्रुवारीमधील सरासरी तापमानामुळे पिके योग्यरीत्या वाढू शकतात; पण याच काळात तापमानात चढउतार होताहेत. आणखी एक चिंताजनक कारण म्हणजे, हिवाळ्यातील मावळत्या वेळी ओस, मावळ नसते. पावसाळ्यात एकसलग पाऊस पडत नाही आणि ज्यावेळी तापमान वाढायला लागते, त्याचा थेट परिणाम अन्न संकटाच्या स्वरूपात दिसून येतो. जेव्हा पीक कापणीची वेळ येते तेव्हा वादळ, गारपीट आणि अशा इतर घटना पिकांचे नुकसान करण्यात कोणतीही कसर सोडत नाहीत.

त्याचप्रमाणे जानेवारी-फेब्रुवारी मध्ये जेव्हा तापमानात घट होण्याची गरज असते, तेव्हा तापमानात होणारी वाढ ही चिंतेचा विषय बनत आहे. हवामान बदलाची परिस्थिती अशीच राहिली, तर काही अन्नपदार्थांच्या उत्पादनात घट होऊन त्यांच्या किमती अनेक पटींनी वाढतील, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. तापमानातील अकाली चढउतारांमुळे कृषी उत्पादनाबरोबरच गुणवत्तेवरही नकारात्मक परिणाम होतो.

हवामान बदलामुळे जगातील देशांमध्ये वेगाने होत असलेल्या नापीक जमिनीबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे; परंतु आतापर्यंत या परिस्थितींना तोंड देण्यासाठी कोणताही ठोस उपाय सापडलेला नाही. आज जगातील बहुतांश देश येऊ घातलेल्या अन्न संकटाबद्दल चिंतेत आहेत. यासाठी मोठ्या परिषदांमध्ये चिंतन चालू आहे. जागतिक अन्न संघटनेसह अन्य संघटना या संकटाबद्दल चिंतेत आहेत. हवामान बदलाचे परिणाम स्पष्टपणे दिसू लागले आहेत, तेव्हा हवामानशास्त्रज्ञ आणि कृषी शास्त्रज्ञांसमोर एक मोठे आव्हान उभे राहिले आहे. हवामान बदलावर सर्वाधिक परिणाम करणार्या घटकांसाठी दुसरा पर्याय शोधावा लागेल. इलेक्ट्रॉनिक उत्पादने आणि नवीन शोधांमुळे आपले जीवन सोपे झाले आहे, यात शंका नाही; परंतु त्याचे दुष्परिणाम झपाट्याने स्पष्ट होत आहेत. रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या अतिरेकी वापरामुळे जमिनीच्या सुपीकतेवर परिणाम झाला आहे. पाण्याच्या अतिरेकी वापरामुळे भूजल पातळी वर्षानुवर्षे खाली जात आहे. मातीची धूप सुरू झाली आहे. जमीन झपाट्याने नापीक होत आहे. या पार्श्वभूमीवर हवामान चक्रातील बदलांना अनुकूल असलेल्या पिकांच्या जाती विकसित करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. कारण, आपण निसर्गाशी छेडछाड करण्यात कोणतीही कसर सोडलेली नाही आणि आज आपण त्याचे परिणाम भोगत आहोत. तीव्र हिवाळ्यात आपल्याला उष्णतेचा सामना करावा लागतो. या सर्वांसोबतच पृथ्वीचे वाढते तापमान नियंत्रित करण्यासाठी उपाययोजनांकडेही लक्ष द्यावे लागेल. परिस्थिती गंभीरपणे चिंताजनक होत चाललेली असताना उपाययोजनांची गाडी कासवगतीने धावत आहे.

# नव्या शैक्षणिक धोरणातील नवे विषय ऑनलाईन उपलब्ध

## महिला महाविद्यालय, अमरावतीचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती-** महिला महाविद्यालय अमरावतीच्या वतीने नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विविध पदवी अभ्यासक्रमांकरीता देण्यात आलेले काही नवीन विषय ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध करून दिलेले आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाची सध्या विद्यापीठ पातळीवर अंमलबजावणी होत असताना विद्यार्थी विकास लक्षात घेऊन काही नवे विषय सुरु करण्यात आलेले आहेत. यामधे अतिशय महत्वाचा विषय म्हणजे भारतीय ज्ञान संपदा. या विषयामधे प्राचीन भारतामधे अस्तित्वात असलेले जागतिक पातळीवर स्पर्धा करु शकणाऱ्या ज्ञान संपदेचा अभ्यास समाविष्ट करण्यात आला आहे.




चारही विद्याशाखेच्या अनुषंगाने वेगवेगळ्या विषयांमधे प्राचीन भारतात कोणते ज्ञान उपलब्ध होते व ते कसे वैज्ञानिक असून त्याचा आजही संदर्भ देता येतो हे सांगण्यात आले आहे. यामधे विज्ञान, धर्मशास्त्र, तत्वज्ञान, स्थापत्यशास्त्र, वाणिज्य, योगाभ्यास, आयुर्वेद, या विषयांमधील मूलभूत प्राचीन ज्ञानाचा समावेश करण्यात आलेला आहे. या विषयाचा विस्तृत अभ्यासक्रम संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने तयार केला आहे. हा संपुर्ण अभ्यासक्रम महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी त्यांच्या यु-ट्युब चॅनलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिला आहे. विद्यापीठ परीक्षेत्रातील विविध विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांनी या ऑनलाईन अभ्यासक्रमाला पसंती दिली असून अनेक विद्यार्थी याचा लाभ घेत आहेत. हा अभ्यासक्रम ३८ व्हिडीयोच्या माध्यमातून उपलब्ध असून तो सोप्या मराठी व हिंदी भाषेमधे समजाविण्यात आला आहे. या व्हिडीयो मधे व्याख्यानासोबत पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन असल्याने हे सारे विषय समजायला अतिशय सोपे झालेले आहेत. चारही विद्याशाखेचा भारतीय ज्ञान संपदा या विषयाचा अभ्यासक्रम याद्वारे उपलब्ध झालेला आहे. या यशस्वी अभ्यासक्रमानंतर आता डॉ. अविनाश मोहरील हे बी.एससी. व बी.कॉम प्रथम वर्षाच्या द्वितीय सत्राच्या विद्यार्थ्यांकरीता असलेला मुल्य शिक्षण -२ हा संपुर्ण अभ्यासक्रम ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध करुन देत आहेत. या अभ्यासक्रमामधे जैवविविधता, पर्यावरणसंवर्धन, पाण्याचे महत्व, डीजीटल इंडीया, ई-कॉमर्स, संगणकाच्या मदतीने होणारे नवे शोध, आर्टीफीशीयल इंटेलीजन्स, यासारख्या अतिशय महत्वपूर्ण विषयांचे अध्यापन केले जाणार आहे. पॉवरपॉईंट प्रेसेंटेशनच्या मदतीने हे सारे विषय शिकविले जातील व दोन क्रेडीट करीता असलेला हा संपुर्ण कोर्स डॉ. अविनाश मोहरील या नावाने असलेल्या यु ट्युब चॅनलवर उपलब्ध होतो आहे. विद्यार्थ्यांना सोयीचे जावे म्हणून या चॅनलवर विषयांच्या वेगवेगळ्या प्ले-लिस्ट बनविण्यात आलेल्या आहेत. ज्यामुळे अभ्यासक्रमातील विविध विषयांचा शोध घेणे सहज शक्य होते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार येणाऱ्या काळात जवळपास ४० टक्के अभ्यासक्रम ऑनलाईन स्वरुपात विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावा लागेल. त्याच धर्तीवर डॉ. अविनाश मोहरील यांनी हे कोर्सेस विद्यार्थ्यांकरीता उपलब्ध करुन दिले आहेत. पूर्णपणे मोफत स्वरुपात हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांकरीता उपलब्ध आहेत ज्याचा फायदा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठच नव्हे तर अन्य विद्यापीठातील विद्यार्थी देखील घेत आहेत. नुकतेच नाशिक येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाने देखील भारतीय ज्ञान संपदा या विषचा अभ्यासक्रम महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिला आहे. हे सर्व विषय यु ट्युब ओपन क्सेस मधे उपलब्ध असून कुणीही याचा लाभ घेऊ शकतो.

या विषयांसोबतच लवकरच बीलीटी एनहान्समेंट कोर्स, ओपन इलेक्टीव्ह कोर्स या अंतर्गत असलेले काही विषय महिला महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक यु ट्युब चॅनलवर विद्यार्थ्यांकरीता उपलब्ध करून देणार आहेत. या सर्व अभ्याक्रमाचे व्हिडीयो या चॅनलवर कायमस्वरुपी उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीनुसार केव्हाही बघता व अभ्यासता येऊ शकतात. सध्या अनेक विद्यार्थी शिक्षणासोबतच नोकरी करीत असल्याने त्यांच्या करीता ही एक अतिशय उत्तम सोय झालेली आहे. विद्यापीठ परीक्षेत्रातील अनेक महाविद्यालयांमधे हे कोर्सेस विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले आहेत व अनेक विद्यार्थी याचा फायदा घेत आहेत. नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या अध्यक्ष डॉ. माया शिराळकर, सचिव निनाद सोमण व संपुर्ण कार्यकारिणीने डॉ. अविनाश मोहरील यांनी महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यापीठ परीक्षेत्रातील सर्व विद्यार्थ्यांकरीता घेतलेल्या या पुढाकाराबाबत समाधान व्यक्त केले आहे.येत्या काळात महाविद्यालयाच्या वतीने अन्य शिक्षकांद्वारे देखील विविध विषयाचा इ-कंटेंट तयार केला जाईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे. या सर्व ऑनलाईन कोर्सेसचा सर्व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन महिला महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

# गांडूळ खताची शेतीला द्या साथ; जमिनीची सुपीकता टिकून उत्पादनात मिळेल वाढ

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक-** रासायनिक सुपीकता भौतिक व जैविक सुपीकतेमुळे बदलता येते, मात्र भौतिक सुपिकता बदलणे व टिकवणे अत्यंत अवघड गोष्ट आहे. त्यासाठी फार मोठा कालावधी लागतो. म्हणूनच सेंद्रिय खताचा अधिकाधिक वापर शेतीत केला पाहिजे.

गांडूळ खत हे आज उपलब्ध असलेल्या सेंद्रिय खतांपैकी एक उत्कृष्ट खत आहे. त्यावर यापुढील काळात भर देण्याची नितांत गरज आहे.देशाची वाढती लोकसंख्या लक्षात घेता शेतकरी बांधवांना अन्नधान्याची पूर्तता करण्यासाठी अधिकाधिक पिके घेणे तसेच त्याच जमिनीवर प्रति हेक्टरी उत्पादन वाढविणे अनिवार्य आहे. परंतु असे असले तरी ज्या पद्धतीने रासायनिक खतांचा बेसुमार वापर वाढला आहे, त्याचा विपरीत परिणाम पर्यावरणावर दिसून येत आहे.दिवसेंदिवस जमिनीची उपजाऊक शक्ती कमी होत आहे. जमिनीतील सूक्ष्मजीवांची संख्या घटून त्या मृतप्राय झालेल्या आहेत. शेतजमिनीची भौतिक, रासायनिक व जैविकदृष्ट्या अपरिमित हानी होत आहे.


शेतकऱ्याचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला असून तो कर्जबाजारी होत आहे. वर्षानुवर्षे एकाच जमिनीत एकाच पिकाची लागवड केली जाते. त्यामुळे जमिनीत पाण्याचा वापर वाढला आहे.

दिवसेंदिवस शेत जमिनीचे प्रमाण कमी होत असून अन्नधान्याची गरज मात्र वाढतच आहे. ही गरज पूर्ण करण्यासाठी उपलब्ध जमिनीचा अधिकाधिक वापर करावा लागणार आहे. त्यासाठी ही जमीन दीर्घकाळ जिवंत, सुपीक ठेवणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे.

गांडूळ खत म्हणजे काय ?

गांडूळ हा जमिनीत राहणारा प्राणी आहे. तो जमिनीतील सेंद्रिय पदार्थ खातो. ते खाल्ल्यानंतर त्याच्या शरीराला आवश्यक असा भाग सोडून उर्वरित भाग विष्ठा म्हणून शरीरातून बाहेर टाकतो, त्यालाच गांडूळ खत किंवा वर्मिकंपोस्ट असे म्हणतात. या क्रियेला २४ तासांचा कालावधी लागतो.गांडूळ जेवढे पदार्थ खातो त्यापकी स्वतच्या शरीरासाठी फक्त दहा टक्के भाग ठेवतो व बाकीचा नव्वद टक्के भाग शरीरातून बाहेर टाकतो. गांडूळखतात वनस्पतीच्या वाढीसाठी लागणारी अन्नद्रव्ये, संप्रेरके, उपयुक्त जीवाणू असून वनस्पतीची रोग प्रतिकारक क्षमता वाढविते.गांडूळखत हे भरपूर अन्नद्रव्ये, संप्रेरके असणारे दाणेदार सेंद्रीय खत असून जैविक गुणधर्म



वाढविते. गांडूळखत हा सेंद्रीय शेतातील एक महत्त्वाचा घटक आहे.




गांडूळास दानवे, वाळे, केचवे, शिदोड, करडू किंवा भूनाग असे अनेक नावे आहे. पृथ्वी तळावर हजारो वर्षापासून गांडूळ अस्तित्वात असून त्याचे रंग व आकार भिन्न भिन्न प्रकारचे आढळून येतात. गांडूळ जांभळी, लाल, तांबडी, निळी, हिरवी व फिकट तांबूस अशा विविध रंगाची असतात.

प्राणी शास्त्राच्या वर्गीकरणाप्रमाणे गांडूळ अनेलीडा या वर्गात दहा कुळामध्ये जवळ जवळ ३२०० जातींची गांडुळे असून त्यापैकी सुमारे ३०० जातीची गांडुळे भारतात आढळून येतात.




जमिनीच्या वरच्या थरात वास्तव्य करून राहणाऱ्या आणि सेंद्रिय पदार्थांवर उपजीविका करणारे व जमिनीत खोलीवर राहून जमिनीत जमिनीत मशागत करून मातीवर उपजीविका करणारे असे दोन गट आहेत.

**गांडूळ खत तयार करण्यासाठी महत्वाचा बाबी**

गांडूळखत प्रकल्प सावलीत व दमट हवेशीर ठिकाणी असावा.

शेणखत व शेतातील पिकांचे अवशेष व झाडाचा पाला यांचे ३:१ प्रमाण असावे व गांडूळ सोडण्यापूर्वी हे सर्व १५-२० दिवस कुजवावे.

खड्ड्याच्या तळाशी प्रथमत: १५ ते २० सें.मी बारीक केलेला वाळलेला पाला पाचोळा टाकावा.

गांडुळाच्या वाफ्यावर गांडुळे सोडण्याअगोदर १ दिवस पाणी मारावे. गांडुळाच्या वाफ्यावर दररोज किंवा वातावरणातील उष्णतेचे प्रमाण पाहून पाणी मारावे.

व्हर्मीवाश जमा करण्यासाठी गांडूळबेडला एक विशिष्ट जाळी दिलेली असावी, तेथे खड्डा करून व्हर्मीवॉश जमा करण्याचे नियोजन करावे.

**डॉ. श्रीकांत मोहन खुपसे**
सहाय्यक प्राध्यापक
एमजीएम, नानासाहेब कदम, कृषी महाविद्यालय, गांधेली, छ संभाजीनगर.


**डॉ. व्ही. जी. अतकरे**
सहयोगी अधिष्ठाता,
कृषी महाविद्यालय, नागपुर.




# मूत्रपिंडाच्या आजारा पासून करा बचाव

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक**

सर्व वयोगटातील लोकांमध्ये मूत्रपिंडाच्या आजाराचे प्रमाण वाढत चालले आहे. चांगल्या आरोग्यासाठी मूत्रपिंडांचे आरोग्य चांगले राखणे गरजेचे आहे. जीवनशैलीत योग्य बदल केल्यास मूत्रपिंडाच्या आजारास प्रतिबंध करता येतो आणि जीवनमान सुधारता येते.



भरपूर पाणी प्या व शरीर हायड्रेटेड राखा : तज्ज्ञांनी केलेल्या विविध अभ्यासांनुसार, योग्य हायड्रेशन मूत्रपिंडातील कचरा फिल्टर करण्यास आणि मूत्रपिंडातील खडे ओळखण्यास मदत करते. दिवसातून सुमारे १० ते १२ ग्लास पाणी प्यायल्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढून टाकण्यास मदत होते. मात्र गरजेपेक्षा जास्त पाणी पिणेही टाळले पाहिजे, विशेषतः मूत्रपिंडासंबंधीच समस्या असलेल्या व्यक्तींनी ओव्हरहायड्रेशन टाळा. तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

निरोगी जीवन आणि संतुलित आहाराचे सेवन करा : ताजी फळे, भाज्या आणि तृणधान्ययुक्त समृद्ध आहार निवडल्यास मूत्रपिंडाचे कार्य सुरळीत होण्यास मदत होते. आहारात अतिरिक्त मीठ, प्रक्रिया केलेले अन्न आणि शर्करायुक्त पेयाचे सेवन टाळावे, कारण ते उच्च रक्तदाब आणि मधुमेहासाठी जोखीम घटक ठरतात जे मूत्रपिंडाच्या आजारास कारणीभूत घटक आहेत. बेरी, पालेभाज्या आणि काजू यांसारखे मूत्रपिंडास अनुकूल अन्न पदार्थांचा आहारात समावेश करावा.

रक्तातील साखर उच्च पातळी आणि उच्च रक्तदाबाची वेळोवेळी तपासणी करावी. आहार, व्यायाम आणि औषधांसह (जर आवश्यक असेल तर) रक्तदाब आणि रक्तातील साखरेची पातळी नियमितपणे तपासणे आणि नियंत्रित करणेयोग्य ठरते. त्यामुळे मूत्रपिंडावरील दाब कमी होऊन मूत्रपिंडाचे दीर्घकालीन नुकसान होणेटळते. वजन नियंत्रित राखा व नियमित व्यायाम करावा. शारीरिक हालचाली रक्ताभिसरण सुधारण्यास मदत करतात. आठवड्यातून पाच वेळा किमान ४५ मिनिटे चालणे, पोहणे किंवा सायकलिंग करावे.

नियमित आरोग्य तपासणीसाठी करावी. मूत्रपिंडाच्या समस्या वेळीच ओळखणे आणि वेळीच व्यवस्थापन करणे गरजेचे आहे, विशेषतः मधुमेह आणि उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठी हे फायदेशीर ठरते. डॉक्टरांशी नियमितपणे संपर्कात राहावे. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय वेदनाशामक औषधे घेणे टाळावे. या नियमांचे पालन करून मूत्रपिंडांचे आरोग्य चांगले राखू शकता आणि मूत्रपिंडाच्या आजाराचा धोका कमी करून निरोगी जीवन जगू शकता.

# मेळघाटातील आदिवासींमध्ये शासनाच्या विविध योजनांबाबत जनजागृती कार्यक्रम

## समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी केले उपक्रमांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या वतीने मेळघाटातील चिखलदरा तसेच धारणी तालुक्यातील आदिवासी बांधवांसह युवक व युवतींकरीता असलेल्या शासनाच्या योजनांबाबत गडगा भांडुम, बहिराटकी, चिखली, सेमाडोह, मांगीया, रोरा, पोटीलावा, हरिसाल, लवादा, कढाव, भुलोरी, हातीदा या गावांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या माध्यमातून आदिवासी महिला व बालकांच्या पोषणाच्या समस्या, आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, शेती, रोजगार,



कुपोषण तसेच शासकीय आश्रमशाळा समुह योजना, पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना, महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी, एकलव्य मॉडेल निवासी शाळा योजना, सैन्य व पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण योजना, व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना, शबरी आदिवासी घरकुल योजना, भूमिहीन दारिद्र्य रेषेखालील आदिवासींचे सबलीकरण, स्वाभिमान योजना, संस्थांना आश्रम शाळा चालवण्यास अर्थसाह्य, शासकीय आश्रम शाळेत कनिष्ठ महाविद्यालय सुरू करणे.तसेच इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे, आदिवासी मुला-मुलींचे शासकीय वसतिगृह, शालांत परीक्षा शिष्यवृत्ती योजना, विद्यार्थी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना, व्यावसायिक पाठ्यमात विद्यार्थ्यांना मिळणारा निर्वाह भत्ता योजना, सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना, आदिवासी मुलामुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना, केंद्रवर्ती अर्थसंकल्प, मोटारवाहन चालक प्रशिक्षण केंद्र योजना, केंद्र शासन सहाय्य योजना, आदिवासी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या, सामाजिक कार्यकर्ता याविषयी माहिती दिली.

संस्था, आदिवासी सेवकांना संस्था पुरस्कार, कन्यादान योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना, पारधी विकास कार्यक्रमांतर्गत घरकुल योजना, भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम अमृत आहार योजना, वन सूचित क्षेत्रातील पंचायत विस्तार, वन हक्क कायदा आदींबाबत माहिती देण्यात आली. तसेच शिक्षण, आरोग्य, पोषण, स्वच्छता, कुपोषण आदींबाबत प्रा. आनंद कासदेकर यांनी कोरकू भाषेतील ऑडिओ क्लिप आदिवासी बांधवांना ऐकवली.या वेळी उपस्थित आदिवासी बांधवांनी अशाच प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १५ मार्च २०२५

शहर/ग्रामिण


# गव्हाने भरलेला भरधाव ट्रक गेट तोडून रेल्वेवर आदळला

## बोदवडनजीक पहाटेची घटना, जिवीत हानी टळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ जळगाव**

धान्याने भरलेल्या ट्रकवरील चालकाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे ट्रक रेल्वे गेट तोडून मुंबई - अमरावती एक्सप्रेसच्या इंजिनवर जाऊन धडकला. यात कुठलिही जिवित हानी झाली नाही. ही घटना शुक्रवारी पहाटे ५ वाजता बोदवड रेल्वेस्थानकापासून ५०० मीटर अंतरावर घडली.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल ते अमरावती डाऊन एक्सप्रेस (क्र.१२१११) ही गाडी सकाळी पाच वाजेच्या दरम्यान बोदवड रेल्वे गेट जवळून जात होती. त्याचवेळी बंद असलेले रेल्वेगेट तोडून एक ट्रक रेल्वे मार्गात घुसला आणि रेल्वे इंजिनवर जाऊन आदळला. इकडे एक्सप्रेसची गती कमी असल्याने चालकाने ब्रेक लावून उडी घेत पसार झाला. एक्सप्रेस चालकाने तात्काळ ब्रेक लावल्याने मोठी दुर्घटना टळली.



गाडी थांबवली. तर ट्रक इंजिनवर धडकताच ट्रकचालक मात्र एक्सप्रेसमध्ये झोपलेले प्रवासी बर्थवरुन खाली पडले. परिणाम झाला आहे. अमरावती एक्सप्रेस त्याठिकाणीच

### नागपूरकडे येणाऱ्या रेल्वे गाड्यांच्या मार्गात बदल

एलटीटी-शालिमार एक्सप्रेस, पुणे-नागपूर एक्स्प्रेस, कोल्हापूर- गोंदिया महाराष्ट्र एक्सप्रेस, सीएसएमटी-हावडा दुरंतो एक्सप्रेस, अहमदाबाद-चेन्नई नवजीवन एक्सप्रेस यांच्या मार्गात बदल करण्यात आला. या गाड्या खंडवा-इटारसी आणि नागपूर मार्गे धावणार आहेत. तसेच भुसावळ-बडनेरा आणि बडनेरा-नारखेड पॅसेंजर गाड्या रद्द करण्यात आल्या.

बोदवडनजीक झालेल्या अपघातामुळे रेल्वेची हाय टेन्शन वायर तुटली आहे. त्यामुळे रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला आहे. अमरावती एक्सप्रेस त्याठिकाणीच थांबविण्यात आली आहे. डाऊन मार्गावरील महाराष्ट्र एक्सप्रेस, भुसावळ - बडनेरा मेमू आणि शालिमार एक्सप्रेस या गाड्या तसेच अप मार्गावरील चेन्नई-अहमदाबाद एक्सप्रेस, वर्धा-भुसावळ या गाड्या ३ते ४ तास उशिराने धावल्या.

# २,७०६ शेतकऱ्यांच्या राज्यात गेल्यावर्षी आत्महत्या

## अमरावती, छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वाधिक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती -** राज्यात १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या एका वर्षात विदर्भ आणि मराठवाड्यातील २,७०६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची कबुली राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव (पाटील) यांनी दिली. अमरावती विभागामध्ये १,०६९ आणि छत्रपती संभाजीनगर विभागामध्ये ९५२ शेतकऱ्यांनी हवामान बदल, ओला, कोरडा दुष्काळ, नापिकी, कर्जबाजारीपणा या कारणांमुळे आत्महत्या केल्याचे त्यांनी सांगितले.



विधान परिषदेत आ. शिवाजीराव गर्जे, आ. अमोल मिटकरी आदी सदस्यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये मंत्री पाटील यांनी ही माहिती दिली. बीड जिल्ह्यात २०५, अमरावती जिल्ह्यात २००, अकोला जिल्ह्यात १६८, तर वर्धा जिल्ह्यात ११२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. या २,७०६ प्रकरणांपैकी १,५६३ प्रकरणे पात्र ठरली आहेत. १,१०१ शेतकऱ्यांच्या वारसांना धनादेशाद्वारे ३० हजार आणि बँकेच्या मासिक प्राप्ती योजनेमधून ७० हजार रुपये अशी १ लाखाची रक्कम दिल्याचे ते म्हणाले.

आत्महत्या केलेल्या काही प्रकरणांची चौकशी अद्याप प्रलंबित असून, छत्रपती संभाजीनगर विभाग (१६७), अमरावती विभाग (१७२), बीड जिल्हा (१४), अमरावती जिल्हा (२९), अकोला जिल्हा (३४) आणि वर्धा जिल्हा (३) यांचा यात समावेश आहे.गेल्या २०२४ वर्षात अमरावती जिल्ह्यात २,८५६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून, सर्व पात्र प्रकरणांसाठीचा निधी देण्यात आला आहे. बीड जिल्ह्यात २०५, अमरावती जिल्ह्यात २००, अकोला जिल्ह्यात १६८, तर वर्धा जिल्ह्यात ११२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. अमरावती विभागात ९,९६१ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे आढळून आली असून, त्यातील ९,८३२ प्रकरणी मदत देण्यात आली आहे, असेही मंत्री पाटील यांनी म्हटले आहे.

# बुरा न मानो होली हैं...! अमरावतीत सर्वत्र धूलिवंदनाचा रंगोत्सव जल्लोषात साजरा

## श्यामनगर मित्र मंडळीने धूलिवंदन मौज मस्ती सहआनंद लुटला







**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

बुरा न मानो होली हैं, रंग बरसे, डीजेवरील गाण्यांवर लहान मुलांसह तरुणाई आणि ज्येष्ठांनीही ठेका धरत अमरावती शहरातील विविध भागांत शुक्रवारी (दि.१४) धूलिवंदनाचा उत्सव साजरा केला.श्यामनगर मित्र मंडळी तर्फे धूलिवंदन मौज मस्ती सहआनंद लुटला.होलिका दहनानंतर धूलिवंदनाच्या दिवशी सकाळपासून ते सायंकाळपर्यंत उत्साह कायम होता. नैसर्गिक रंगाचा वापर करत लाल, पिवळा, हिरवा, निळा, गुलाबी अशा विविध रंगांनी भरलेले चेहरे दिसत होते. कोणी मित्रांसोबत, तर कोणी सोसायटीत मोठ्या उत्साहात रंगांची उधळण केली, तर दुसरीकडे इव्हेंटमध्ये मोठ्या प्रमाणात तरुणाईचा जल्लोष दिसून आला. अनेक ठिकाणी सेलिब्रिटीना बोलविण्यात आले होते.

श्यामनगर परिसरात तरुण-तरुणींनीही डीजेच्या तालावर ठेका धरत जल्लोषपूर्ण वातावरणात रंगोत्सव साजरा केला. अनेक प्रकारे रंगलेल्या चेहऱ्यांनी मित्रांसह दिसून आले. गाड्यांवरून एकमेकांच्या घरी जाऊन रंग खेळणारे तरुण-तरुणी या उत्सवाचा आनंद घेत होते. महिलाही होळीचा आनंद लुटताना दिसल्या. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या श्यामनगर परिसरात हि नागरिकांनी एकत्र येत धूळवळी चा मोठा जल्लोष साजरा केला.











# प्रचलित पद्धतीनुसार परीक्षांचे वेळापत्रक ठरविण्याचे नियोजन शाळा स्तरावरच असावे

### प्राथमिक शिक्षक समितीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती -** राज्यातील सर्व शाळांमध्ये इ. १ ली ते ९ वी इयत्तांसाठी वार्षिक परीक्षा/संकलित मूल्यमापन /झ-ढ चाचण्यांचे आयोजन एकाच वेळी करणेचे पत्र निर्गत झाले आहे. त्यानुसार दि. ८ एप्रिल ते २५ एप्रिल २०२५ दरम्यान परीक्षा /चाचण्या घेण्याचे नमूद आहे.

प्रचलित पद्धतीनुसार चाचणी परीक्षा आयोजित करणे हे शाळा स्तरावरचे नियोजन असते. वाढता उष्मा, शाळेतील भौतिक सुविधा, शिक्षक-विद्यार्थी संख्या, उत्तरपत्रिका तपासणे, गुणतक्ते तयार करणे, संकलित/वार्षिक परीक्षा नोंदवहीत निकाल नोंदविणे, विद्यार्थीनिहाय स्वतंत्र गुणपत्रक भरणे, नामवर प्रमोशन नोंदी घेणे आणि इयत्ता अखेर शाळेतून बाहेर जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे शाळा सोडण्याचे दाखलेतयार करणे आणि महाराष्ट्र दिनी (१ मे) निकाल जाहीर करणे अशी सर्व परीक्षा विषयक कामे असतात. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ७५% पेक्षा अधिक प्राथमिक शाळांत स्वतंत्र मुख्याध्यापक नाही. मुख्याध्यापक आणि शिक्षकांकडे एकापेक्षा अधिक वर्गाचे अध्यापन असून परीक्षेचे सर्व कामकाज त्यांनाच बघावे लागते.

ठढए मधील तरतुदीनुसार चाचण्या घेण्याचे नियोजन हे संबंधित शाळेकडेच आहे. सोबतच इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या नवागत विद्यार्थ्यांचा शाळा पूर्वतयारी मेळावा एप्रिल मध्येच घ्यावा लागतो. वाढत्या उन्हासोबतच पाण्याचे दुर्भिक्ष आणि वीज पुरवठा खंडित होणे इत्यादी कारणांमुळे विद्यार्थ्यांना त्रास होऊ नये या उद्देशानेच १५ एप्रिलपर्यंत परीक्षांचे आयोजन केले जाते. वरील वास्तव लक्षत घेता २५ एप्रिल पर्यंत परीक्षा घेण्याचे वेळापत्रक कोणत्याही दृष्टीने सुसंगत नसल्याने संदर्भित आदेश रद्द करून प्रचलित पद्धतीनुसार परीक्षांचे वेळापत्रक ठरविण्याचे नियोजन शाळा स्तरावरच असावे अशा मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे राज्य सरचिटणीस राजन कोरगांवकर यांच्या कडून सचिन्द्र प्रतापसिंग, राज्य आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे राहुल रेखावार संचालक , पुणे शरद गोसावी शिक्षण संहलक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना एका निवेदनाद्वारे करण्यात आल्याचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.-

# सर्व कार्यालयांनी स्पर्धेत सहभागी व्हावे-जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१५अमरावती -** राज्य शासनाने क्षेत्रीय स्तरावरील शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा कृति आराखडा निश्चित केला आहे. या आराखड्यामध्ये दिलेल्या मापदंडानुसार गुणांकन करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्हास्तरावरील सर्व कार्यालयांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे स्पर्धेबाबत माहिती दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातून महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, भातकुली उपविभागीय अधिकारी मिन्नू पीएम, धारणी उपविभागीय अधिकारी प्रियंवदा म्हाडदडकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव आदी जिल्हास्तरीय कार्यालय प्रमुख उपस्थित होते.



श्री. कटियार यांनी पहिल्या टप्प्यात केवळ चार विभागांसाठी असलेला कृति आराखडा संपूर्ण शासकीय यंत्रणेला लागू करण्यात आला आहे. त्यामुळे सर्व कार्यालयांनी यात भाग घ्यावा. कार्यालयाच्या समस्या इतर विभागाच्या मदतीने सोडविण्यास मदत होत असल्यास निश्चितच मदत घ्यावी. प्रामुख्याने परिसर स्वच्छता, अभ्यागतांसाठी असलेली व्यवस्था, नागरिकांच्या समस्या सोडविणे आदी मानके ही कार्यालयीनस्तरावरील असल्याने यावर भर द्यावा, असे आवाहन केले.

# धुळवडीच्या दिवशी रंगाचा भंग! महाराष्ट्रात आठ जणांचा बुडून मृत्यू; रंग खेळून पोहणं जीवावर बेतलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५यवतमाळ–**

धुळवडीच्या सणाच्या दिवशी महाराष्ट्रात आठ जणांचा मृत्यू झाला. ठाणे, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली या जिल्ह्यांत या घटना घडल्या आहेत. यात एका १४ वर्षीय युवकाचाही समावेश आहे. वेगवेगळ्या घटनांत मृत्यू झालेले तरुण धुळवड खेळून पोहण्यासाठी गेले होते.



त्यातील एक जण बुडत असल्याची बाब लक्षात येताच त्याच्या मित्रांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र, एकाला वाचवताना इतह तीन मित्रही पाण्यात बुडाले. बदलापूर अग्निशामक दलाच्याकडून कर्मचाऱ्यांनी शोध घेऊन त्यांचे मृतदेहर बाहेर काढण्यात आले. रंगपंचमीनंतर अंघोळीसाठी प्राणहिता नदीवर गेलेल्या तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना शुक्रवार (१४ मार्च) दुपारी २ वाजेच्या सुमारास महाराष्ट्र–तेलंगणा राज्याच्या सीमेवर घडली. कामपल्ला राजकुमार (वय २०, रा. वेमनापल्ली जि. मंचेरियाल–तेलंगणा) असे मृत तरुणाचे नाव आहे.सिरोंचा तालुक्याच्या मोयाबीनपेठा जवळील प्राणहिता नदीच्या पलीकडील भागापासून तेलंगणा राज्याची सीमा सुरू होते. याच हद्दीतील वेमनापल्ली गावातील कामपल्ली राजकुमार हा तरुण धुळवड खेळून मित्रांसोबत प्राणहिता नदी पात्रात अंघोळीकरिता आला होता. अंघोळ करताना तो खोल पाण्यात गेला. त्याला पोहता येत नव्हते. त्यामुळे तो बुडला.

## धरणात बुडून दोन मावस भावांचा मृत्यू

डोंगरखर्डा (यवतमाळ) : येथून जवळच असलेल्या खोरद येथील धरणात पोहण्यासाठी आठ जण गेले होते. त्यातील पाच जण बुडत असताना त्यातील तिघांना वाचविण्यात आले, तर दोन मावस भावांचा मृत्यू झाला. शुक्रवारी (१४ मार्च) धुळवड खेळून अंघोळीसाठी दुपारी धरणात उतरले असताना ही घटना घडली.पंकज अशोकराव झाडे (वय ३५, रा. झाडगाव, राळेगाव), जयंत पंढरी धानफुले (वय २८, रा. मार्डी, ता.मारेगाव) अशी मृतांची नावे आहेत. ते दोघे अरुण भोयर यांच्या घरी पाहुणे म्हणून आलेले होते.

## १४ वर्षाच्या युवकाचा डोहात बुडून मृत्यू, दुसरा जखमी

आर्वी (वर्धा) : रंग खेळून झाल्यावर नाल्यावर आंघोळीस गेलेल्या एका बालकाचा मृत्यू झाला तर दुसरा नाका तोंडात पाणी गेल्यामुळे जखमी झाला. त्याला उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही घटना शुक्रवारी घडली.राजवीर संतोष सिंग तवर (वय १४ वर्ष, रा. मायबाई वार्ड) असे मृतक बालकाचे नाव आहे. सुजल गजानन चांदुरकर (वय १७ वर्ष, रा. मायबाई वार्ड) याच्यावर दवाखान्यात उपचार सुरू आहे.

# काँग्रेस घेणार ३० मतदारसंघांत वाढलेल्या मतदारांचा शोध

## नवे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा पुढाकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५पुणे** : काँग्रेस राज्यातील ३० विधानसभा मतदारसंघांमधील मतदान प्रक्रियेचा अभ्यास करणार आहे. लोकसभेला होते त्यापेक्षा लक्षणीय संख्येने मतदार वाढलेले हे विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यासाठी कार्यकर्ते प्रशिक्षित करण्यात आले असून, ते मतदार याद्यांचा अभ्यास करून थेट मतदारांबरोबर संपर्क साधणार आहेत.पक्षाच्या केंद्रीय शाखेंतर्गत काम करणाऱ्या काँग्रेसच्या प्रोफेशनल नलिसिस विंगचा, वाढलेले मतदार बोगस असल्याचा आरोप असून, त्यासाठी ही शोधमोहीम राबवण्यात येणार आहे. पक्षाचे नवे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ



यांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. या ३० विधानसभा मतदारसंघांमध्ये पक्षाच्या वतीने काही कार्यकर्ते पाठवण्यात येतील. लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाने वापरलेल्या मतदारयाद्या या कार्यकर्त्यांजवळ देण्यात येतील. मतदारसंघाचे काही विभाग करून ते लोकसभेला नसलेल्या पण विधानसभे-साठी समाविष्ट झालेल्या मतदारांचा शोध घेतील. त्यांच्याबरोबर संपर्क साधतील. ज्या नावांचे मतदार मिळणार नाहीत, घरे सापडणार नाहीत, त्यांची हे कार्यकर्ते नोंद करतील. याबरोबरच या कार्यकर्त्यांना याशिवाय आणखी काही गोष्टींचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यावरही ते काम करतील. राज्यातील जे ३० विधानसभा मतदारसंघ काँग्रेसने निवडले आहेत तिथे लोकसभा व विधानसभांच्या दरम्यान असेच लक्षणीय संख्येने मतदार वाढले आहेत. हे मतदारसंघ कोणते, याचाही तपशील काँग्रेसकडून मिळाला नाही. मात्र, काँग्रेसच्या बड्या नेत्यांबरोबरच अगदी कमी संख्येने पडलेल्या महाविकास आघाडीच्या उमेदवारांचेही मतदारसंघ यात असल्याची माहिती मिळाली.

# श्री अंबादेवी मंदिरात होलिका दहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती** विदर्भाची कुलस्वामिनी श्री अंबादेवी व श्री एकवीरा देवी मंदिराच्या प्रांगणात गुरुवारी (ता. १३) सायंकाळी होळीचे दहन करण्यात आले. शेकडो वर्षापासूनची परंपरा असलेली ही होळी महिनाभरापूर्वी स्थापन होत असते व होळीच्या दिवशी विधिवत पूजा, अर्चना, आरतीनंतर तिचे दहन करण्यात येते. गुरुवारी सायंकाळी श्री अंबादेवी संस्थानचे अध्यक्ष ॲड. दिपक श्रीमाळी यांनी सपत्निक ब्रम्हवृंदाच्या मंत्रोच्चारात या होळीची विधिवत पूजा–अर्चना केली. अमरावतीचे पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, विना रेड्डी यांनी सुध्दा उपस्थिती दर्शवून दर्शनाचा लाभ घेतला. यावेळी श्री अंबादेवी संस्थानचे विश्वस्त रविद्र कर्वे, विद्याताई देशपांडे, मिनाताई पाठक, ॲड. राजेंद्र पांडे, विलास अ.मराठे यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. तर श्री एकवीरा देवी मंदिरात संस्थानचे सचिव शेखर कुळकर्णी यांनी सपत्निक होळीची पुजा अर्चना केली. यावेळी संस्थानचे विश्वस्त अविनाश श्रॉफ, ॲड. डॉ. रविंद्र मराठे, डॉ. अनिल खरैय्या, टेम्बे आदी उपस्थित होते.



# गुगल मॅपवर विमानतळाचे नाव डॉ. पंजाबराव देशमुख विमानतळ !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**





अमरावती (बेलोरा) विमानतळाला गुगलने डॉ. पंजाबराव देशमुख एअरपोर्ट अमरावती असे नाव दिल्याचे समोर आले आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या हवाई प्रवासासाठी सज्ज झालेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने १९९२ मध्ये या विमानतळाची धावपट्टी तयार केली होती. तेव्हापासून तर आतापर्यंत म्हणजेच तब्बल ३३ वर्षांपासून या विमानतळावर केवळ व्हीव्हीआयपींची चार्टर्ड विमाने उतरत होती. प्रवासी वाहतुकीसाठी मोठी विमाने उतारण्यासाठी धावपट्टीचीलांबी वाढविणे गरजेचे होते. २००९ पासून हा मार्ग आता प्रशस्त झालेला आहे. अमरावती विमानतळावरून या महिन्याच्या अखेरीस विमान उडण्याची घोषणा करण्यात आलेली आहे. मात्र त्यासोबतच विमानतळाच्या नामकरणाचा वाद रंगू लागला आहे. सरकारने या विमानतळाला प्रज्ञाचक्षु ज्ञानेशकन्या गुलाब महाराज यांचे नाव देण्याचा निर्णय घेतल्याच्या वार्तेने हा वाद समोर येऊ लागला आहे. या विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुख विमानतळ, असे नाव यापूर्वी देण्यात आलेले होते, असे सांगितले जात आहे. त्यासंबंधीचे दाखले दिले जात आहे. त्याला गुगलने बळकटी दिलेली आहे. गुगल मॅपवर विमानतळाचा उल्लेख डॉ. पंजाबराव देशमुख एअरपोर्ट असा आहे. ज्याअर्थी गुगलने विमानतळाला नाव दिलेले आहे, याचा अर्थ सरकारने विमानतळाच्या नामकरणाचा घोळ घातल्याचे स्पष्ट होत आहे.–

# राज्यात आता सातबारा होणार ‘जिवंत’

## राज्यभरात जिवंत सातबारा मोहीम राबविण्याचा शासनाचा विचार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५बुलढाणा** – शेतकऱ्याच्या मृत्यूनंतर अनेक वर्षे वारस नोंदणी न झालेल्या सातबारांमध्ये आता महसूल वारसदारांच्या नोंदी करणार आहे. याद्वारे मृत सातबारा 'जिवंत' करण्यात येणार आहे.

शेतकरी मरण पावल्यानंतर त्यांच्या वारसदारांमध्ये शेती आणि मालमत्तेच्या वाटणीवरून वाद निर्माण झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. वारसदारांची संख्या अधिक असल्यास सामोपचाराने वाटप होऊ शकले नाही. या एकमेव कारणामुळे राज्यातील शेकडो एकर शेतजमीन मृत शेतकऱ्यांच्या नावावर वारसदारांची संख्या वर्षानुवर्षे वाढत गेल्यामुळे वारस नोंदणी प्रक्रियेत मोठ्या अडचणी येत आहेत, तर दीर्घ प्रक्रियेमुळे अनेक प्रकरणे रखडलेली आहेत. याचा फटका शेतकऱ्यांचे वारसदार आणि शासकीय उद्देशाला बसत आहे. सातबारा अपडेट नसल्यामुळे शेतकऱ्यांना पंतप्रधान किसान पीककर्ज योजना, पीक विमा, आणि विविध कृषी योजनां पासून वंचित राहावे लागत आहे. मृत शेतकऱ्यांच्या नावावर जमीन असल्यामुळे शासकीय योजनांचा लाभ विद्यमान वारसदारांना मिळत नाही. राज्यातील शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी मृत शेतकऱ्यांच्या वारसदारांच्या नावावर नियमानुसार





जमिनींची नोंदणी करणार आहे, अशी माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.बुलढाणा जिल्ह्यातील चिखलीचे तहसीलदार संतोष काकडे यांनी १५९ गावांमध्ये 'जिवंत सातबारा' मोहीम राबविली होती. या मोहिमेअंतर्गत न्यायालयीन प्रकरणे वगळता १ हजार ४८७ प्रकरणांमध्ये वारस नोंदीची प्रक्रिया सुरू करून अवघ्या एका महिन्यात ५०२ खातेदारांच्या वारसाचे फेरफार पूर्ण झाले. ही मोहीम पूर्ण यशस्वी झाल्याचे पाहून जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी महसूल विभागाच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यात तिचा समावेश केला आहे. सध्या बुलढाणा जिल्ह्यात ही मोहीम सुरू आहे. शासनाने या मोहिमेचा अहवाल मागवला असून, आता राज्यभरात जिवंत सातबारा मोहीम राबविण्याचा शासनाचा विचार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

# अमरावती महानगरपालिकेचे आयोजन नेहरु मैदान येथे वृक्षपूजन करुन होळीचा सण साजरा

## महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती** – शहरात दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा पारंपरिक पद्धतीने; पण पर्यावरणपूरक होळी साजरी केली जाते. पर्यावरणाची हानी होऊ नये म्हणून शहरात होळीला कोणत्याही प्रकारची लाकडे न जाळता प्रदूषणविरहित असा होलिकोत्सव साजरा केला जातो. यावर्षीही तशाच प्रकारे होळी साजरी करण्यात येणार असल्याची माहिती महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी दिली.

होळीच्या १५ दिवस आधीपासून परिसरातील झाडांचा पालापाचोळा शहरातील नागरिक गोळा करतात, होळी सजवतात. नारंपरिक पध्दतीने होळीची पूजा केली जाते. पर्यावरण जागृतीचा संदेश देण्यासाठी नेहरु मैदान येथे वृक्षपुजन करुन होळीचा सण साजरा करण्यात आला. यावेळी श्रीमती कमलताई वई, आयुक्त सचिन कलंत्रे, अतिरिक्त नायुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र बानखडे, शहर अभियंता ईश्वरानंद नपालिया, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, न्द्यान अधिक्षक श्रीकांत गिरी, वनराई विभागाचे मधुकर घारड, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, धनंजय शिदे, डॉ. नरेशचंद्र काठोडे, वृक्ष मित्र प्रविण रंग वासनिक, प्रा. अरुण इंगोले, रमेशभाऊ सा गोकादम, सुरेश शिरभाते, हरिभाऊ मोहोड, हे उद्यान निरिक्षक मुकेश खारकर, माजी अ नगरसेवक अजय सारसकर, प्रदिप हिवसे, क प्रभाताई आवारे, रामधन जाधव, गजानन वडे, राजेश लोखंडे, पृथ्वी चव्हान, सचिन रामेकर, गोलू इंगोले, सुरेश भोपसे, आकाश मानकर, सतिश ढोके, प्रदिप बर्वे, राजेश चव्हाण, महेश जोशी,



मनोहर राठोड, नागेश चारथळ, श्रीकृष्ण कांबळे, सचिन दांडगे, अशोक चिचखेडे उपस्थित होते. होळीप्रमाणेच धूलीवंदनही कोणतेही रासायनिक रंग न वापरता, स्वतःच बनविलेल्या नैसर्गिक रंगांपासून खेळले जाते, असे आयुक्तांनी सांगितले. पारंपरिक पध्दतीने साजऱ्या होणाऱ्या या होलिकोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले आहे.परंपरा जपत होळी नक्की करा, पण त्यासाठी वृक्षतोड करू नका. टाकाऊ पदार्थांची होळी साजरी करा. यावेळी महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी अमरावतीकर नागरिकांना होळीच्या शुभेच्छा दिल्या.

# अमरावती विमानतळाला विमान वाहतुकीचा परवाना !

## पश्चिम विदर्भातील सर्वांसाठी अभूतपूर्व अशी सुवर्णसंधी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## अमरावतीकरांच्या स्वप्नाला पंख भरारीचे लागले!!

**`विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती–** अमरावती विमानतळावरील वाहतुकीसाठी अत्यावश्यक असणारा नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाचा (डीजीसीए) एअरोड्रोम परवाना आज मिळाला. यामुळे गेले अनेक वर्षांचे हवाई वाहतुकीचे अमरावतीकरांचे स्वप्न आता लवकरच पूर्ण होणार आहे.

अमरावतीचे पालकमंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी, अमरावतीकरांच्या स्वप्नालापंख भरारीचे लागले!!, अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांनी या विमानतळासाठी मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या पाठपुराव्याचा उल्लेख करून त्यांचे आभार मानले व या क्षणाची उत्कटतेने वाट बघणाऱ्या माझ्या अमरावतीकरांचे पालकमंत्री म्हणून मी मनपूर्वक अभिनंदन करतो.आपल्या प्रतिक्रियेत पालकमंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणतात,

गगनभरारी घेण्याचा अमरावतीकरांच्या स्वप्नातील क्षण आता जवळ आला. अमरावती विमानतळावरील वाहतुकीसाठी अत्यावश्यक असणारा नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाचा (डीजीसीए) एअरोड्रोम परवाना आज मिळाला.. येथून लवकरच जगभरात उड्डाण सुरू होतील!नेता कणखर आणि दृष्टा असला की, स्वप्न वास्तवात उतरतात. आपले मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांनी या विमानतळ संबंधीच्या अनेक विषयांत लक्ष घातले. माळरानावरील विमानतळ ते आता उड्डाणपर्यंतच्या प्रक्रियेत मोलाचा पुढाकार घेतला. ते अमरावतीचे पालकमंत्री असतानाही त्यांनी अनेक बैठकी घेतल्या आणि मुख्यमंत्री झाल्यावर सचोटीने पाठपुरावा केल्यानेच, आज केवळ अमरावतीच नव्हे, तर पश्चिम विदर्भातील सर्वांसाठी अभूतपूर्व अशी सुवर्णसंधी उपलब्ध झाली.मार्च २०२५ च्या



अखेरीस विमान वाहतूक सुरू होणार आहे. प्रवास, व्यवसाय, पर्यटन व उद्योगाला चालना मिळून जनतेच्या इच्छा आकांक्षाना प्रगतीचे पंख फुटतील. विकासाला कवेत घेऊन जगावर स्वार होणारे हे उड्डाण असेल.अमरावती जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून मी अमरावतीकरांचे मनापासून अभिनंदन करतो, असे त्यांनी म्हटले आहे.

# ओपन हायव्होल्टेज ट्रान्सफॉर्मरमुळे पक्षांचे जीवन धोक्यात, २० पक्षी जिवंत जळाले

## महावितरण ढिम्म : झाकणच बसविले नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

विद्युत विभागाच्या निष्काळजीपणामुळे आठवड्याभरात २० पक्ष्यांचा मृत्यू झाला. कठोरा रोडवरील नारायणनगर येथे राहणाऱ्या पक्षीप्रेमी दिलीप नंदागवळी यांच्या घरासमोरील हायव्होल्टेज ट्रान्सफॉर्मरच्या कनेक्शन बॉक्सला झाकण नसल्यामुळे मैना तिथे घरटे बनविण्याकरिता जातात व विद्युत शॉक लागून त्या मरण पावतात. ही बाब लक्षात आल्यावर महावितरणला त्यांनी ऑनलाइन तक्रार केली. तक्रार केल्या केल्याच त्यांना तक्रारीचे निरसन झाल्याचा मेसेज त्यांच्या मोबाइलवर मिळाला. तक्रारीचे निरसन मात्र झाले नाही. दररोज तेथे दोन ते तीन मैना शॉक लागून मरतात.



नारायणनगर ते कठोरा रोडवारील या हायव्होल्टेज ट्रॉन्सफॉर्मरमध्ये चुकीच्या पद्धतीने तारा जोडण्यात आल्या. त्यामुळे त्याला झाकण बसविण्यात आले नाही. ते उंचीवर असल्याने तिथे कुणाचा हात जरी जात नसला तरी अशा ठिकाणी पक्षी मात्र जातात व ते शॉक लागून मरण पावतात, हे वास्तव आहे.

**तर जबाबदारी तुमची**

तक्रारींचे निरसन होत नसल्याने दिलीप नंदागवळी यांनी महावितरणला पत्र पाठविले. आपणास ट्रांसफॉर्मरला झाकण बसविता येत नसेल तर ते लावण्यासाठी मी स्वतःच चढतो. मात्र, मला काही झाल्यास त्याची जबाबदारी मात्र विद्युत विभागाची राहील, असे त्यांनी मेलद्वारे कळविले.

नंदागवळी हे निवृत्त शिक्षक आहेत. त्यांना भूतदया आहे. त्यांच्या घरात सुद्धा त्यांनी पक्ष्यांकरिता घरटे तयार केले आहे. त्यांच्या अंगणात अनेक झाडे असल्याने त्यांच्याकडे नेहमीच पक्ष्यांचा चिवचिवाट असतो.

# न्यायाधीश, दोन संशयित फौजदारांची एकत्र धुळवड

## एकत्रित रंगांची उधळण करतानाचे फोटो व्हायरल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५केज**

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाची सुनावणी ज्यांच्याकडे सुरू आहे त्या केज येथील मकोका जलदगती न्यायालयाचे न्यायाधीश सुधीर भाजीपाले व या प्रकारणातील सहआरोपी करण्याची मागणी असलेले दोन संशयित पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन व निलंबित असलेले पोलिस उपनिरीक्षक राजेश पाटील, यांनी शुक्रवारी केज येथील साईनगर (पूर्व ) परिसरात एकत्र येऊन धुळवड साजरी केल्याने खळबळ उडाली आहे.



भाजीपाले, महाजन व पाटील एकत्रित रंगांची उधळण करतानाचे फोटो समाज माध्यमावर झळकल्याने तालुक्यात तीव्र प्रतिक्रिया उमटली आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या आरोपींना वाचविण्याचा प्रयत्न करणारे पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन, निलंबित पोलिस उपनिरीक्षक राजेश पाटील यांचे न्यायाधीश सुधीर भाजीपाले यांच्याशी लागेबांधे असतील तर, सरपंच संतोष देशमुख हत्याकांडातील आरोपींना शिक्षा होईल का, असा प्रश्न आता देशमुख कुटुंबीयांना पडला आहे. या फोटोची शुक्रवारी दिवसभर केज तालुक्यात चर्चा सुरू होती.

# महादेव खोरी येथे होळी ची सत्संगाची दिंडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

स्थानिक महादेव खोरी परिसरात, श्री संत सद्गुरू विदेही मोतीराम महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व श्री संत सद्गुरू वसंत बाबा यांच्या मार्गदर्शनात गेल्या २५ वर्ष सातत्याने सुरु असलेल्या धुलिवंदनाच्या दिवशीची सत्संगाची दिंडी शोभयात्रा परंपरे प्रमाणे उत्साहाने पार पडली.



या सत्संगाच्या दिंडी शोभयात्रेत महादेवखोरी, मंगलधाम, यशोदा नगर भागातील हजारो नागरिकांनी भाग घेतला.महादेव खोरी परिसरात फिरताना भक्तांनी टाळ मृदूंगच्या तालावर ताल धरला,भजन करीत,सर्वांनी सत्संगाच्या मार्गाने वाटचाल केली.दिंडीच्या मार्गात भक्तांसाठी किरणताई गुप्ता यांनी शरबत वाटप केले.या कार्यक्रमाची सांगता, संत नगरी शेगाव येथील श्री संत धुमाळ बाबाजी यांच्या काल्याचा कीर्तनाने झाली, कीर्तनात होळीच्या आनंदात,नशामुक्ती आणि ईश्वर भक्तीच्या रंगाची उधळण याचे महत्व सांगण्यात आले.आणि भक्तांना महाप्रसादचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी महादेव खोरी येथील किरण गुप्ता,विजय टांगले, राजू भुरले,रेखा शेंडे,कांता टेकाम तसेच भाजपचे पदाधिकारी राजेश आखेगावकर, गजानन देशमुख, लखन राज, विष्णुपंत गवळी, संजय तायडे सहभागी झाले होते.

# जुना धामणगाव येथे शेतकरी पुत्राची गळफास लावून आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १५ धामणगाव रेल्वे**

तालुक्यातील जुना धामणगाव येथील सत्तावीस वर्षीय युवकाने आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारला (ता.१४) सायंकाळच्या सुमारास घडली.



मिळालेल्या माहितीनुसार असे की,तालुक्यातील अनिकेत रमेश सदाफले (२७) याने आपल्या राहत्या घरी कोणी नसतांना गळफास लावून आत्महत्या केली.याप्रकरणी दत्तापुर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.जुना धामणगाव येथील स्मशान भूमीत शनिवारला (ता.१५) अंत्यसंस्कार करण्यात आले.अनिकेत याचेकडे गंगाजळी शेत शिवारात सामूहिक शेती होती.परंतु सततची नापिकी होत होती.आपल्या पश्चात आई,वडील,एक भाऊ,एक बहिण व बराच मोठा आप्त परिवार आहे.

# शेतकऱ्यांनो जमिनीची घ्या काळजी

## युरियाचा अतिवापर जमिनीसाठी ठरतोय घातक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

स्वस्त रासायनिक खत असल्याने युरियाचा अनिर्बंध वापर सध्या खरीप, रब्बी व बागायती पिकांसाठी होत आहे. त्यामुळे जमिनीचा पोत खराब होत असताना पाण्यात नायट्रेटचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे मानवी आरोग्यासदेखील घातक आहे.

युरियाचा अनिर्बंध वापर सध्या पिकांसाठी होत असल्याने मानवी आरोग्यावर त्याचे विपरित परिणाम होत असल्याचे डॉक्टरांचे मत आहे. युरियामुळे पिकांच्या उत्पादनात वाढ होत असल्याचा समज शेतकऱ्यांमध्ये आहे. यामुळेच युरियाचा वापर वाढला आहे. प्रत्यक्षात हा गैरसमज आहे. केवळ युरियाच नव्हे तर डीएपीसह अनेक रासायनिक खतांच्या वापराचे प्रमाण वाढले आहे. युरिया जमिनीत मुरल्यानंतर पाण्यात नायट्रेटचे प्रमाण वाढते व नदी, नाले, विहिरी, कूपनलिकांमधील पाण्यात मिसळले जाते व पिण्याच्या पाण्याद्वारे नायट्रेट शरीरात जात असल्याने मानवी आरोग्यास धोकादायक असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

**मानवी आरोग्यावर होतात परिणाम**

पिण्याच्या पाण्यात नायट्रेटचे प्रमाण अधिक आढळून आल्यास व हे पाणी लहान मुले, गर्भवती महिलांच्या पिण्यात आले तर अशा पाण्यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे गंभीर आजारदेखील होऊ शकतात. असे आरोग्य विभागाने सांगितले.

युरियापेक्षा द्रवरूप नॅनो युरिया वापरल्यास धोका कमी होतो. परंतु शेतकऱ्यांमध्ये दाणेदार युरियाचा वापर करण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे धोक्याचे प्रमाणदेखील वाढतच असल्याने कृषी विभागाने व्यापक प्रमाणात जनजागृती करणे महत्त्वाचे आहे.

**– प्रवीण राऊत, शेतकरी**

**पाण्यात नायट्रेटचे प्रमाण वाढते**

पिण्याच्या पाण्यात युरियामुळे नायट्रेट मिसळले जाते. या पाण्यामध्ये नायट्रेटचे सुरक्षित प्रमाण प्रतिलिटर ४५ मिली ग्रॅमपेक्षा जास्त असता कामा नये. पाणी परीक्षण प्रयोगशाळांच्या अहवालानुसार काही पाणी नमुन्यांमध्ये नायट्रेटचे प्रमाण हे ६० ते ८० मिली ग्रॅमपर्यंत आढळले आहे. त्यामुळे युरियाचा अतिवापर टाळणे महत्त्वाचे आहे. दूषित पाण्यामुळे रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होते. यासह अनेक आजार होण्याची शक्यता असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी पटकाविले पारितोषिके

## कुलगुरूंचे हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

अमेठी विद्यापीठ, उत्तर प्रदेश (नोएडा), नवी दिल्ली येथे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सदर युवा महोत्सव स्पर्धेमध्ये देशभरातील १४८ विद्यापीठांच्या कलावंत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कलावंत चमूने उत्कृष्ट सादरीकरण करुन तब्बल ०४ पारितोषिके पटकाविली. चमूमध्ये पाश्चिमात्य वाद्य संगीत कलाप्रकारामध्ये प्रथमेश अडाळगे याला तृतीय पारितोषिक, फाईन आर्ट (पोस्टर मेकींग) कलाप्रकारामध्ये कु. प्रगती सुधा हिला तृतीय पारितोषिक,



सुगम संगीत कलाप्रकारात मोहम्मद अबसार मोहम्मद साबीर याला तृतीय पारितोषिक व शास्त्रीय तालवाद्य कलाप्रकारामध्ये चेतन खापरे याला चतुर्थ पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.

विध्यार्थ्यांच्या या अभूतपूर्व यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी त्यांचा सत्कार करुन पुढे म्हणाले, कलावंत विद्यार्थ्यांनी अतिशय मेहनत घेवून आपल्या कला राष्ट्रीय स्तरावर सादर करुन प्राविण्य मिळविले आहे. त्यांच्या रुपाने विद्यापीठाचा नावलौकिक देशपातळीवर पोहचल असून, ही निश्चितच अभिमानास्पद कामगिरी आहे. भविष्यात आमचे कलावंत विद्यार्थी विविध कलाक्षेत्रात आणखी उत्तुंग भरारी घेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त करुन विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना भावी यशासाठी शुभेच्छा दिल्यात. विद्यार्थी विकास विभागांतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या विभागातून विद्यार्थ्यांना सर्वतोपरी सुविधा उपलब्ध करुन देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

विध्यार्थ्यांच्या यशाबद्दल विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी अभिनंदन केले. चमू व्यवस्थापक म्हणून डॉ. सावन देशमुख व प्रा. नेत्रा मानकर यांनी काम पाहिले. यशस्वी विद्यार्थ्यांचे सार्वत्रिक अभिनंदन होत आहे.

# जुना धामणगाव येथील गोडाऊन समोर उभ्या असलेल्या ट्रक मधून ५० पोते खत चोरीला

## ठाणेदार गिरीश ताथोड यांच्या पथकाने दोन तासात आरोपी केले जेरबंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १५ धामणगाव रेल्वे**

तालुक्यातील जुना धामणगाव येथील बालाजी मंगल कार्यालयाच्या मागे एका गोदामाजवळ उभ्या असलेल्या दोन ट्रक मधून कोरोमंडळ कंपनीच्या ५० खतांच्या पोत्याची चोरी केल्याची घटना शुक्रवारला (ता.१४) उघडकीस आली होती.दत्तापुर पोलिसांनी अवघ्या दोन तासात ठाणेदार गिरीश ताथोड यांच्या नेतृत्वातील पोलीस पथकाने

चोरी करणाऱ्या आरोपींचा छडा लावला व आरोपीला ताब्यात घेऊन मुद्देमाल हस्तगत केला. दत्तापुर पोलीस ठाण्यात याप्रकरणी गोडावुन ईन्चार्ज मयूर विजय गहनेवार कॉटन मार्केट चौक दत्तापुर फिर्याद नोंदविली होती.या गोडावुन मालक जयेश लड्ढा रा. अमरावती हे असून जुना धामणगाव येथील बालाजी मंगल कार्यालयाचे गोडाऊन आहे.



दरम्यान ट्रक चालक पवन बन्शीलाल जोषी यांनी त्यांचे ट्रक क्रमाक एम.एच. २७ एक्स ८४८८ तसेच ट्रक चालक मनोज मधुकर दूधे यांनी त्याचा ट्रक क्रमांक एम एच ३१ सी. बी. ३९६९ ज्यामध्ये खताचे बॅग असलेला ट्रक गोडाउन बाहेर उभ्या करून ताळपत्रीने झाकून ते त्याचे घराकडे निघुन गेले होते.

शुक्रवारला (ता.१४) सकाळच्या सुमारास व गोडाउन मॅनेजर राजेश वानखडे व फिर्यादी मयूर विजय गहनेवार हे गेले असता गोडाउन समोर असलेला ट्रक क्रमाक एम एच २७ एक्स ८४८८ वरील ताळपत्री निघालेली दिसली.यामुळे ट्रकमध्ये वर जावुन पाहीले असता ट्रक मध्ये असलेल्या खताचे बॅग चोरी गेलेल्या दिसल्या म्हणुन दुसऱ्या ट्रकची पाहणी केली असता ट्रक क्रमांक एम एच ३१ सी. बी. ३९६९ वरील सुध्दा ताळपत्री निघालेली दिसली व ट्रकमध्ये वर जावुन पाहीले असता एक मध्ये असलेल्या खताचे बॅग चोरी गेलेल्या म्हणून गोडाउन मालक यांना माहीती दिली. कोणीतरी अज्ञात चोरट्याने गोडाउन बाहेर असलेल्या रोडवरील ट्रक क्रमाक एम एच २७ एक्स ८४८८ मधील कोरोमंडळ कंपनीच्या १५, १५, १५, ०९ च्या खताच्या २५ बॅग तसेच ट्रक क्रमांक एम एच ३१ सी. बी. ३९६९ मधील कोरोमंडळ कंपनीच्या २०, २०, ०, १३ च्या खताच्या २५ बॅग अशा एकूण दोन्ही ट्रक मधुन एकुण ५० खताच्या बॅग किंमत ८९ रुपयांचा माल चोरून नेला.

दरम्यान दत्तापूर पोलिसांनी ठाणेदार गिरीश ताथोड यांच्या मार्गदर्शनाखाली तपास चक्रे वेगाने फिरवीत अवघ्या दोन तासात संशयित आरोपींचा शोध घेतला.आशिष गजानन बनकर (२८) व मोरेश्वर लक्ष्मण भलावी (४१) रा.धामणगाव या दोन संशयित आरोपींना ताब्यात घेवून मुद्देमाल हस्तगत केला.ठाणेदार गिरीश ताथोड, पोलीस कर्मचारी सागर कदम, नवनाथ खेडकर,अरुण पवार,पवन महाजन, यांनी ही कारवाई केली.

**स्वीट डिझायर जप्त**

या चोरीसाठी वापरण्यात येणारी स्वीट डिझायर गाडी क्रमांक एम.एच.४९ यू ५६५० दत्तापुर पोलिसांनी जप्त केली आहे.अधिक तपास पोलीस करीत आहे.

# गांधी आश्रम मित्र परिवार तर्फे आनंदात रंगोत्सव साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

भारतीय संस्कृतीमध्ये होळी आणि रंगपंचमी ला अनन्य साधारण महत्व आहे.मानवी जीवनात येणारे बदल हे रंगासारखे सुंदर आणि निरागस असावे या करीता रंगाची उधळण होत असते .या निमित्ताने संपूर्ण देशभर रंगपंचमी मोठ्या उत्साहात साजरी होती.

शहरातील गांधी आश्रम परिसरात तरूण युवकांनी एकमेकांना रंग लावत शुभेच्छा दिल्या. होळी आणि रंगपंचमी म्हटले की सर्व लहान थोर मंडळी खास करून युवा पिढीच्या आनंदाला पारवार नसतो.



परंतु याचा अतिरेकही कुठे कुठे होताना आपल्याला दिसून येतो. होळी आणि रंगपंचमी हा सण जणू मद्य प्राशन करून धिंगाणा घालण्यासाठीच येतो की काय असेही चित्र आपल्याला कुठे कुठे पहावयास मिळते, होळी असल्यामुळे या सर्व गोष्टी करण्यासाठी आपल्याला संपूर्णतः सूट दिलेली आहे. अशा वातावरणात काही मंडळी आपल्याला या दिवशी वावरताना दिसतात. परंतु या सर्व गोष्टींना फाटा देत गांधी आश्रमाच्या या मित्र परिवारांनी अतिशय आदर्शवत रंगपंचमी हा सण साजरा केला. ज्या रंगांनी कोणालाही कोणताच त्रास होणार नाही अशा प्रकारचे सर्व हर्बल रंग वापरून त्यांनी ही रंगपंचमी साजरी केली. रंगपंचमी सोबतच येणारे अनेक धार्मिक सण अशाच प्रकारे या मित्र परिवारातर्फे साजरे करण्यात येतात.

यावेळी अमोल पाचपोर,सागर लोखंडे,सुरज डोंगरे, योगेश खडसे,जुगल लोखंडे, सुमित सोनटक्के,करण वानखडे, यांनी रंगपंचमीचा आनंद लुटला.

# चांदूर रेल्वेतील सेंट्रल बँकेच्या इमारतीला आग, बँकेतील कॅश काऊंटरमधील रोकड, महत्वाची कागदपत्रे , फर्निचर जळून खाक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५चांदुर रेल्वे**

चांदूर रेल्वे येथील सेंट्रल बँकेच्या इमारतीला शनिवारी दुपारी आग लागली. या आगीमुळे बँकेतील लाखो रुपयांच्या नोटा आणि फर्निचर भस्मसात झाले असून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे शर्थीचे प्रयत्न करण्यात येत आहे. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. सुदैवाने या आगीत जीवितहानी झालेली नाही.




सेंट्रल बँकेच्या चांदूर रेल्वे येथील शाखेत नियमित कामकाज सुरू असताना दुपारी १२ वाजताच्या सुमारास एका ठिकाणाहून धूर निघत असल्याचे निदर्शनास येताच पळापळ झाली. ग्राहक आणि बँकेतील कर्मचारी लगेच बाहेर पडले. आगीने काही क्षणातच रौद्र रुप धारण केले. आगीच्या घटनेची माहिती चांदूर रेल्वे नगर परिषदेच्या अग्निशमन दलाला देण्यात आली. अग्निशमन दलाचे वाहन घटनास्थळी पोहोचले. आग विझवण्याचे प्रयत्न सुरू झाले. आग आटोक्यात येत नसल्याचे पाहून तिवसा आणि धामणगाव रेल्वे येथून अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले.

या आगीत जिवितहानी झालेली नसली, तरी बँकेतील कॅश काऊंटरमधील रोकड, महत्वाची कागदपत्रे आणि फर्निचर जळून खाक झाल्याचा अंदाज आहे. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी बघ्यांची मोठी गर्दी जमली होती. पोलिसांनी देखील तत्काळ पोहचून बंदोबस्त वाढवला.बँकेतील एसी मध्ये शॉर्ट सर्किट झाले आणि तेथून ही आग पसल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. आगीत नेमके मालमत्तेचे किती नुकसान झाले, याची माहिती अद्याप मिळू शकली नाही.आगच्या ठिकाणी लागली त्या खोलील लागूनच हॉस्पिटल आहे आणि विद्युत मंडळाचे तालुका कार्यालय असल्याने कॉम्प्लेक्समधील दुकानाला आगीची झळ पोहचताच इतर दुकाने बंद करण्यात आली होती. आग लागल्याच्या अर्ध्या तासानंतर धामणगाव रेल्वे आणि चांदूर रेल्वे नगर परिषदेच्या अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी येऊन संपूर्ण आग आटोक्यात आणली होती.

> चांदूर रेल्वे येथे सेंट्रल बँकेमध्ये आग लागलेली होती त्यामध्ये बँकेतील लॉकर व कॅश सुरक्षित आहे तरी कोणत्याच प्रकारची बँकेजवळ गर्दी करू नये.
>
> **बँक मॅनेजर**
> **चांदुर रेल्वे**

# बच्चू कडू यांनी धुलीवंदनाच्या निमित्ताने रस्ते रंगवत सरकारकडे केल्या विविध मागण्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५कुरळपुर्णा**

राज्यभरात धुलीवंदनाचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. बच्चू कडू यांच्याकडून अनोख्या पद्धतीने होळी साजरी करण्यात आल्याचे पाहायला मिळत आहे. बच्चू कडू यांनी धुलीवंदनाच्या निमित्ताने सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भिंती रंगवत अनोखी होळी साजरी केली आहे. रस्ते रंगवत बच्चू कडूंनी सरकारकडे अनेक मागण्या केल्या आहेत.



शेतकऱ्यांची कर्जमाफी करा, स्वामीनाथन आयोग मान्य करा, शेतकऱ्यांच्या शेत मालाला भाव द्या, पेरणी ते कापणीपर्यंत कामे रोजगार हमी योजनेअंतर्गत करावी. सरकारने दिलेले आश्वासन सरकारने पूर्ण करावे, दिव्यांगांना प्रति महिना सहा हजार रुपये मानधन देण्यात यावे, घरकुल बांधकाम करण्यासाठी पाच लाख रुपये अनुदान. युवा धोरण पेपर फुटीचा कायदा मंजूर करावा, बांधकाम कामगाराप्रमाणे शेतमजुरांना सुद्धा योजनेचा लाभ द्यावा, शेतमजूर व प्रकल्पग्रस्तांसाठी वित्तीय महामंडळ निर्माण करावे. अशा अनेक मागण्या बच्चू कडू यांच्याकडून करण्यात आल्या आहेत.

# तापमानाचा भडका! विदर्भात तीव्र उष्णतेची लाट; पाऱ्याने चाळीशी ओलांडली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५नागपूर**

विदर्भासह राज्यात बहुतांश ठिकाणी कमाल तापमान रोज नवे उच्चांक गाठत आहे. अशातच हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भातील अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा आणि नागपुरात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. तर उद्या म्हणजेच रविवारी (१६ मार्च) अकोल्यात ही लाट कायम राहणार असल्याची शक्यता नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने दिला आहे. दुसरीकडे विदर्भातील जवळ जवळ सर्व जिल्ह्यांतील उष्णतेच्या पाऱ्याने चाळीशी ओलांडली आहे. परिणामी संभाव्य उष्णतेची लाट लक्षात घेता योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन ही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.





नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सद्या विदर्भातील जवळ जवळ सर्व जिल्ह्याचा पारा हा ४० डिग्रीच्या पार पोहचला आहे. अशातच आज (१५ मार्च) विदर्भातील अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा आणि नागपुरात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. तर चंद्रपुर (४१.४) ब्रम्हपुरी (४१.२) आणि वर्धा येथ ४१ डिग्री सेल्सियस इतके तापमान नोंदविण्यात आले आहे. तर आगामी काळात हेच तापमान सामान्यपेक्षा ३ ते ४ डिग्रीने पारा वाढणार असल्याचे ही सांगितलं जातंय. साधारण ३५ अंशांच्या पलीकडे तापमान हे मार्च महिन्याच्या शेवटाला विदर्भातील असतं. मात्र उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच तापमानाने सामान्यपेक्षा अधिक पारा गाठल्याने आगामी काळात उष्णतेनं शहरं आणखी तापण्याची शक्यता आहे. परिणामी हवामान विभागाने आगामी काळासाठी नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनावर लवकरच चित्रपट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५चंद्रपूर**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या महासमाधी स्थळाला 'अ' तीर्थक्षेत्र दर्जा मिळवून देण्यासाठी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला. तसेच, नागपूर विद्यापीठाला राष्ट्रसंतांचे नाव देण्यासाठी विधिमंडळात आणि बाहेर यशस्वी लढा दिला. अलीकडेच त्यांनी सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांची भेट घेतली.



सांस्कृतिक कार्य मंत्री असताना आ. श्री. मुनगंटीवार यांनी काढलेल्या राष्ट्रसंतांच्या जीवनावर आधारित चित्रपटाच्या शासनादेशासंबंधी त्यांनी शेलार यांच्याशी चर्चा केली. तसेच, या चित्रपटाच्या कार्यारंभ आदेशासाठी पुढील पावले उचलण्यावर भर दिला. राष्ट्रसंतांच्या विचारांचा प्रचार आणि सेवेसाठी सदैव समर्पित राहण्याचा आपला संकल्प आ. मुनगंटीवार यांनी यावेळी पुन्हा अधोरेखित केला.

समाजप्रबोधन, अंधश्रद्धा निर्मूलन आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे कार्य पुढील पिढीपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने त्यांच्या जीवनावर आधारित चित्रपट निर्मितीची संकल्पना मांडण्यात आली. आता हा चित्रपट लवकरच साकारण्यात येणार असून याकरीता आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्याशी चर्चा केली. शेलार यांनी या संदर्भात लवकरच कार्यारंभ आदेश काढण्यात येईल, असा शब्द आ. श्री. मुनगंटीवार यांना दिला.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी अंधश्रद्धा व जातिभेदाच्या निर्मूलनासाठी कार्य केले आहे. अंधश्रद्धा, जातीभेद निर्मूलन, समाजजागृती आणि देशभक्तीचा संदेश देण्यासाठी भजन–कीर्तनाच्या माध्यमातून लोकप्रबोधन केले. विदर्भात त्यांचा विशेष प्रभाव असला तरी त्यांनी संपूर्ण देशभर समाजप्रबोधन केले. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग होता आणि त्यांना अटकही झाली होती. त्यातूनच त्यांच्या प्रेरणादायी जीवन प्रवासावर चित्रपट निर्मितीचे नियोजन सुरू आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री असताना आ. मुनगंटीवार यांनी या चित्रपट निर्मितीचा निर्णय घेतला होता.

या चित्रपट निर्मितीसाठी सहाय्यक अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील थोर व्यक्तींच्या जीवनावर चित्रपट निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने धोरण आखले आहे. त्याअंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनावर आधारित चित्रपट निर्मितीला सहाय्यक अनुदान देण्यास शासन निर्णयान्वये, प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे, हे विशेष.

# 'कविवर्य सुरेश भट यांच्या स्मारकासाठी सरकार सकारात्मक नाही', साहित्यिकांची खंत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

कविवर्य सुरेश भट यांना जाऊन २२ वर्षे झाली आहेत. पण, त्यांच्या कविता, गाणी, शायरी, गझल आणि विविध आठवणींचा दरवळ अजूनही आसमंतात तितकाच ताजा आहे. प्रत्येक गाण्याच्या मैफलीत सुरेश भटांची एकतरी कविता, गीत किंवा नामोल्लेख हा असतोच. मराठी भाषेत गझल हा काव्यप्रकार रुजवणारे सुरेश भट गझलांच्या मैफलींमध्ये आजही तरुण आहेत.



नामवंत गायकांच्या आवाजाच्या रुपाने सुरेश भट यांच्या गझला व कविता आजही तशाच टवटवीत आहेत. 'आज गोकुळात रंग', 'आताच अमृताची बरसून', 'गे मायभू तुझे मी', 'चल उठ रे मुकुंदा', 'चांदण्यात फिरताना', 'तरुण आहे रात्र अजुनी' अशा अनेक गीतांच्या माध्यमातून अजूनही तरुण असलेले सुरेश भट यांचे जन्मगाव अमरावती. भट यांच्या या जन्मभूमीत त्यांचे यथोचित स्मारक व्हावे, ही येथील साहित्यिकांची अपेक्षा. गेल्या अनेक वर्षांपासून स्मारकाच्या उभारणीची मागणी केली जात आहे, पण सरकार स्मारकाच्या उभारणीसाठी सकारात्मक नाही, अशी खंत साहित्य वर्तुळातून व्यक्त केली जात आहे.

कवी विष्णू सोळंके म्हणतात, आपण स्मारकाच्या उभारणीसाठी १८ जानेवारी २०२० रोजी तत्कालीन पालकमंत्री यशोमती ठाकूर यांना लेखी स्वरूपात निवेदन सादर केले. यावर अमरावती जिल्ह्यातील सामाजिक बांधिलकी जपणारे नागरिक, पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर, साहित्यिक, कलावंत यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. मात्र जवळपास पाच वर्षे पूर्ण झाली आहेत. शासनाने या बाबतीत मात्र कोणत्याही प्रकारचा निर्णय घेतला नाही, हेच खरे दुःख आहे. शहरात केवळ उंची इमारती झाल्या म्हणजे ते गाव सांस्कृतिक ऐतिहासिक उंची गाठत नाही, असे मला वाटते. त्या गावात किती साहित्यिक कलावंत आहेत. ही खरी सामाजिक व सांस्कृतिक ऐतिहासिक उंची असते.

अमरावती जिल्ह्यातील सुरेश भट व मधुकर केचे यांचे स्मारक अमरावती येथे झाले पाहिजे, तसेच उद्धव शेळके यांचे स्मारक हे तळेगाव ठाकूर येथे म्हणजे त्यांच्या जन्मगावी व्हावे, यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना सुद्धा लेखी स्वरूपात निवेदन पाठविले आहे. पण, त्याची अजूनही दखल घेतली गेली नाही. कोणत्याही सरकारला साहित्यिक, कलावंत यांची काही किंमत असते असे मला वाटत नाही, ही खंत विष्णू सोळंके यांनी व्यक्त करताना याबाबत सरकारने सकारात्मक निर्णय घेतला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# मेळघाटातील शासकीय आश्रमशाळा बिजूधावडी येथील ३०० विद्यार्थ्यांनी स्वगावी न जाता शाळेतच साजरी केली होळी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५ धारणी**

शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा बीजुधावडी येथे यावर्षी होळी निमित्ताने वस्तीगृहातील ३०० विद्यार्थ्यांनी स्वगावी न जाता शाळेमध्येच कर्मचाऱ्यांसोबत मोठ्या उत्साहात होळी सण आदिवासी परंपरेनुसार साजरा केला त्या निमित्ताने ढोल ताशे सह गादली सुसून सारखे आदिवासी नृत्याचे सादरीकरण शाळेतील विद्यार्थ्यांनी केली. आश्रम शाळा बिजुधावडी येथील शालेय प्रशासनाने आदिवासी विद्यार्थ्यांचा होळीतील उत्साह द्विगुणित व्हावा. या उद्देशाने भरगच्च तीन दिवसीय कार्यक्रमाचे नियोजन यावर्षी केले होते दिनांक १३/३/२०२५ रोजी होळी तयार करण्याकरिता शाम पाटणकर क्रीडा शिक्षक, भिलावेकर सर यांचा मार्गदर्शनात होळी ची उभारणी करून संध्याकाळी शाळेतील मुख्याध्यापक ए. के. धांडे यांनी सहपरिवार होळीची पूजन केले त्यानंतर ढोल गदली नृत्यावर नाचण्याचा मनमोहक आनंद विद्यार्थ्यांनी घेतलायादरम्यान शाळेतील अधीक्षक श्री.डाखोरे, अधिक्षिका कु. जावरकर सह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



# चला भिजवाया अंतरंग, होळीनिमित्त सांझाग्राम येथे स्नेहमिलन, सांझाग्राम मालधुर येथे अनोख्या पद्धतीने धुळवळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

तिवसा तालुक्यातील सांझाग्राम समर्पण मालधुर येथे नैसर्गिक रंग व चिखलात आनंद साजरा करून स्नेहसोहळा रंगपंचमी दिनी पार पडला.समर्पण प्रतिष्ठान द्वारा संचालित सांझाग्राम मालधुर येथे दि. १३ मार्च ला सायंकाळी ७ वाजता दरवर्षी प्रमाणे निमंत्रीत तथा सांझाग्राम परिवारातील निराधार महिला तथा युवक युवती यांच्या नियोजनात परिसरात साफसफाई करून होळी दहन करण्यात आली.होळीचा दुसरा दिवस म्हणजेच रंगपंचमीच्या सणाला महाराष्ट्रातून विविध प्रकारच्या संस्थानाचे प्रतिष्ठित व्यक्ती येथे दरवर्षी न चुकता हजेरी लावुन उपस्थित असतात.या सांझाग्रामशी जुळलेलं नातं निभावात संगीत खुर्ची, गाण्याची आतिषबाजी, गीतगायन, असे वेगवेगळ्या कार्यक्रम सादर करून सांझाग्राम मधील महिलांच्या आनंद हरवलेल्या जीवनात काही प्रमाणात आनंद उत्सोवाची भर घालण्याचे कार्य सांझाग्रामचे संचालक अमोलजी मानकर यांच्या माध्यमातून केल्या जाते.



सांझग्राम येथील महिला उपेक्षित राहू नये म्हणून येथे प्रत्येक सण हा साजरा करण्यात येतो.त्याचप्रमाणे रंगपंचमी हा सप्तरंगाचा रंग हरवलेल्या अन्यायग्रस्त महिला व १८ वर्षावरील मुलाकरिता कार्यरत असणाऱ्या समर्पण द्वारा आगळवेगळा रंगउत्सव साजरा करण्यात आला आहे.या अनोख्या धुळवळीचा अनुभव म्हणजे असा कि बगर केमिकल रंगाची उधळण, दुसरीकडे स्पेशल गोटे वेचून तयार करण्यात आलेला चिखल आणि चिखलात वरून स्पिन्कलरने उडविलेले जाणारे पाण्याचे तुषाराच्या मोहक स्पर्षात शरीराला पोषक असलेल्या मातीचा लेप अंगावर घेऊन नव्या संकल्पना अमोलजी मानकर, सागर व स्नेहल मिसाळ, जळगाव खान्देश, मनोज व देवयानी गोविंदवार रेवार्थ, देवम, गोविंदवार मुंबई विनोद देशमुख नागपूर, दिनकर तायडे स्वामींनी तायडे, जयश्री देशमुख, तेजस गोटारकार, अमोलजी मानकर, जयश्री मानकर अमरावती इत्यादींनी सहभाग अनोख्या पद्धतीने रंगपंचमी साजरी करण्यात आली.

# पारश्री हॉस्पिटल बाहेर जनरेटरला भीषण आग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

एकीकडे उन्हाच्या झळा वाढत आहेत, तर दुसरीकडे अमरावतीत आगीच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होताना दिसत आहे. फेब्रुवारी महिन्यातच शहरात १० आगीच्या घटना घडल्या असून, १५ मार्च रोजी खापर्डे बगीचा परिसरात आणखी एक मोठी आग लागली पारश्री हॉस्पिटलच्या बाहेर असलेल्या जनरेटरला भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

'खापर्डे बगीचा परिसरातील पारश्री हॉस्पिटल बाहेरील जनरेटरला अचानक आग लागली हॉस्पिटल प्रशासनाने तातडीने अग्निशमन विभागाला संपर्क केला अग्निशमन अधिकारी विलासराव उमेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशमन वाहन तत्काळ घटनास्थळी पोहोचले.

हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यानी आग विझवण्याचा प्रयत्न केला, पण ती पूर्णपणे आटोक्यात आली नाही. अखेर अग्निशमन विभागाच्या टीमने ४५ मिनिटांच्या प्रयत्नानंतर होजरीलच्या मदतीने आग आटोक्यात आणली. यामध्ये अग्निशमन वाहन चालक सागर टपके, फायरमन अमोल साळुंके आणि रोशन अलूडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या दुर्घटनेत पारशी हॉस्पिटलचे अंदाजे १५ लाख रुपयाचे नुकसान झाले असले तरी जीवितहानी झालेली नाही अग्निशमन दलाच्या त्वरित कारवाईमुळे मोठी दुर्घटना टळली या घटनेमुळे आगीच्या वाढत्या घटनांवर नियंत्रण आणण्यासाठी अधिक सतर्क राहण्याची गरज असल्याचे स्पष्ट होते.

तर अमरावती शहरात आगीच्या घटना वाढत असताना नागरिकांनीही अधिक काळजी घेण्याची गरज आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत आग लागण्याच्या घटना वाढू शकतात, त्यामुळे अग्निशमन उपाययोजनांकडे दुर्लक्ष न करता आवश्यक ती खबरदारी घेणे गरजेचे आहे.